# श्री साईलीला

★

कि. ५० पैसे

2-4-78



शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक

स्थापना १९१६




साईबाबांच्या
मूर्ती पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर**

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. ८९६३१



# श्री साई वाक्सुधा

अनेक जन्मींचें पुण्य साचलेले असते. तें जसजसें वाढत जातें तसतसें भाग्य उदयास येण्याचा दिवस येण्याचा जवळ येऊं लागतो. संत समागम एखाद्यास उगाच घडत नाहीं. संताकडे जाण्याची बुद्धीहि सहजासहजी होत नाहीं. अंतःकरणांतील अंधकार कमी कमी होत गेलेला असतो. प्रकाश ज्योती पेटण्याच्या बेतांत आलेली असते. अशा वेळीं संतसमागम घडतो. मग विचाररूपी अग्नी पेटूं लागतो. अंगीं वैराग्य येऊं लागतें. आणि जें कांहीं पाप कोनाकोपऱ्यांत, अडगळींत दडून राहिलेलें असतें त्याचा नायनाट होऊं लागतो. कारण जीवन साफल्याचा समय नजीक येऊन ठेपलेला असतो.

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४२ वें ] नोव्हेंबर १९६४ [ अंक ८ वा

: संपादक :

श्री. श्रीपाद बाळकृष्ण दर्पे

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ६३३६१

: कार्यालय :

साई निकेतन,' डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८०, बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

साईबाबांना काळोखाचा कंटाळा असे. त्यांना वाटे जिकडे तिकडे प्रकाश असावा. बाहेर प्रकाश, आंत प्रकाश, सर्वत्र प्रकाशच प्रकाश. जनतेची अंतःकरणें प्रकाशानें व्यापलीं जावी. तेथें काळोखाला जागा नसावी म्हणून ते सदा-सर्वकाळ झटत असत. सायंकाळ झाली म्हणजे मशिदीतून, देवळांतून दिवे लावण्याचा त्यांचा छंद आरंभकाळीं फार दांडगा होता. पणती प्रकाश देणारी. मिळतील तेवढ्या पणत्या जमा करायच्या. त्यांत तेलवात घालायची आणि त्या रांगेनें लावायच्या ! किती सुंदर दृश्य दिसतें नाहीं का ? या बाहेरच्या प्रकाशानें प्रेक्षकांचीं मनेंही भारून जावीं. ती प्रकाशमय व्हावीं, त्यांच्या अंतःकरणांतील काळाकभिन्न काळोख देशोधडीस लागावा हीच त्यांची सद्भावना असे.

हा दिवाळीचा आठवडा. या आठवड्यांत आपण नाहीं का घरांतील कोनाकोप-ऱ्यांतील काळोख नाहींसा व्हावा म्हणून पणत्या लावीत ? ती पूर्वापार वहिवाट आहे. आज काल ती नाहींशी होण्याच्या मार्गावर असली तरी दिवाळींत पणती घरोघर दिसते.

बाबा पणत्या लावून रोजच्या रोज दिवाळी साजरी करीत. तसे करण्यांत त्यांचा कांहीं ना कांहीं हेतू असे. पण त्यांना तेल लागतें तें गावांतील तेली वाणी दुकान-दार यांच्याकडे जाऊन मागून आणायचें. हा नित्याचा क्रम असे. ते तेली, वाणी तरी तुमचा हा छंद किती दिवस पुरविणार ? रोजच्या रोज ही काय कटकट आमच्या मागें असे एक दिवस त्यांना वाटल्याशिवाय कसें राहील ?

तेथपर्यंत बाबांची थोरवी त्या लोकांना पटलेली नव्हती. हा कोणी तरी वेडगळ छंदी माणूस आहे, असें त्यांना वाटायचें. त्यांना त्यांची ओळख पटलेली नव्हती आणि म्हणून तर एक दिवस सर्वांनीं बाबाना तेल देण्याचें नाकारलें. सर्वांनीं नकार दिला ! आतां काय करणार ? कोणावर रागावणार व गुरगुरणार ? बाबांचा तो स्वभाव नव्हता. अज्ञानामुळें लोक वाटेल तसे वागतात ! त्याला काय करायचें ?

बाबा कोणावरही रागावले नाहींत. ते हात हालवीत मशिदीकडे परतले. पणत्या होत्या वाती तयार होत्या. नव्हतें काय तें तेल ! तेल नाहीं म्हणून पणत्या पेटवल्या नाहींत का ?

मग बाबांनीं काय केलें ? त्यांनीं तांब्याभर पाणी घेतलें व रांगेनें ठेवलेल्या पणत्यांत ते पाणी ओतीत गेले ! बघे लोक रस्त्यावर उभे राहून ही मौज पहात होते.

२८३

किती वेडगळ आहे हा माणूस ! तेलाच्या ऐवजीं कोणीं कधीं पाण्याचा उपयोग केला आहे का ? आणि केलाच तरी पाणी तेलाप्रमाणें पेटणें व सतत पेटत रहाणें कधींकाळीं शक्य आहे का ? असें नानाप्रकारचें विचार त्या लोकांच्या मनांत त्याक्षणीं वावरत होते ! आज यांची चांगली फजिती होणांर व आपणास टाळ्या पिटायला मिळणार या विचारानें सारे लोक धुंद झालेले होते !


परंतु काय आश्चर्य पहा ! बाबांनीं काडी पेटविली व प्रत्येक पणतीची वात ते नित्याप्रमाणें शिलगावीत गेले. वाती पेटल्या ! फुरफुरल्या नाहींत कीं मालवल्या नाहींत ! हां हां म्हणता साऱ्या पणत्या पेटल्या ! त्यांतील एकही मालवली नांहीं ! सर्व लोकांनीं आश्चर्योन्मादानें कडाकड टाळ्या वाजविल्या !

बांबा शांतपणें त्या पणत्याकडे पहात होते. चेहऱ्यावर, आनंदाचें किंवा आश्चर्यांचें कांहीं चिन्ह नव्हतें !

शिरडींत आगमन झाल्यापासून सर्वांचें डोळे दिपविणारा व अंतःकरणांत खोलवर जाऊन पोहोंचणारा असा बाबानीं जो पहिला चमत्कार निरुपायानें केला तो हाच होय. तेव्हांपासून बाबा हे कोणी वेडगळ नाहींत तर थोर योग्यतेचे सत्पुरुष आहेत अशी सर्वांची भावना झाली. चमत्कार तेथें नमस्कार ही आम्हां लोकांची सर्वसाधारण भावना आहे. तिला कोण काय करणार ?

या दिवाळीच्या निमित्तानें शिरडींत बाबानीं पेटविलेल्या पणत्यांची सहज आठवण झाली. तुमची आमची अंतःकरणानें सदासर्वकाळ अशींच प्रेमभावानें प्रकाशीत होवोत व आमचे तुमचें सर्वांचें जीवन सुखकर होवो हीच या प्रसंगी श्रीसाई चरणीं प्रार्थना.

—संपादक



मित्रपणानें मरण पत्करण्यापेक्षां, बहादुरीनें प्रहार करीत देह सोडणें मी अधिक पसंत करीन.

अत्याधिक विरोधी परिस्थितींतच माणसाची परीक्षा होत असते.

म. गांधी

# क्षमा व सत्यभाषण

**या जगांत क्षमा व सत्यभाषण हीं दोन प्रभावी व महत्त्वाचीं शस्त्रें आहेत. परंतु तीं आजकाल किती लोकांकडून आचरणांत आणलीं जातात? प्रत्येकानें तीं महान् तत्त्वें आचरणांत आणण्यासाठीं झटलें पाहिजे. कारण मनुष्याचे ते दोन शोभादायक अलंकार आहेत.**

सुशिक्षित मनुष्याच्या अंगीं जे गुण अवश्य असले पाहिजेत त्यांमध्यें क्षमा हा गुण अत्यंत महत्वाचा आहे. मनुष्यांस परस्परांचे हातून, जाणून बुजून म्हणा किंवा समजुतीनें अपकार होणें हें मानवी स्वभावाकडे पाहिलें म्हणजे अगदीं साहजिक दिसतें. क्रोध, ईर्ष्या, लोभ, मद, मत्सर इत्यादि विकार विवेकाचें बंधन तोडून यत्किंचित् जरी बळावले, तरी मनुष्यांमध्यें नानाप्रकारच्या अपकारांस कारण होतात; मग ते उपकार कोणत्याहि प्रकारचे असोत. या विकारांच्या अमलांत मनुष्यें एकमेकांस कधीं शारीरिक कधीं मानसिक पीडा कमजास्त मानानें दिल्यावांचून राहात नाहींत. जर या सर्व अपकारांबद्दल मनुष्यांनीं एकमेकांवर सूड घेतला, आणि आपणास पीडा करणाऱ्यास लागलीच उलट पीडा केली, तर मानवीजातीचें दुःख आहे त्यापेक्षां फार वाढून अत्यंत दुःसह होईल. म्हणून ईश्वरी योजनेनें मनुष्याच्या ज्ञानाची जसजशी वृद्धि होते, त्याचा अनुभव जसा जसा अधिक होतो, तसतसे त्याचे मनोविकार विवेकाच्या अंकित होतात. हा परिणाम नेहमीं एकसारखाच होतो असें नाहीं. कधीं कधीं विद्या व अनुभव हीं वाढलीं तरी पूर्वसंस्कारानें म्हणा किंवा संगतीच्या योगानें म्हणा, त्या विद्येपासून अथवा त्या अनुभवापासून क्रोधादि विकारांचें नियमन फारसें होत नाहीं. अशीं मनुष्यें अत्यंत अविद्वान व रानटी मनुष्याप्रमाणें क्रोधादिकांच्या आधीन होऊन अनेक प्रकारें परपीडा करितात; व दुसऱ्यानें केलेल्या अपकाराला सहन न करितां तत्काळ त्याचा सूड घेण्यास मागें पुढें पाहात नाहींत. त्यांचे ठिकाणीं विद्या असते, अनुभव असतो, परंतु विवेक नसतो. क्वचित् असला तरी जितका असावा तितका जागृत किंवा दृढ नसतो. यामुळें वेळोवेळीं ज्या ज्या विकारांचा आविर्भाव त्यांच्या अंतःकरणांत होतो त्यांच्या आधीन होऊन ते वर्ततात. परंतु प्रायः विद्या, अनुभव हीं असून त्यांतहि सुशिक्षण असलें, तर विवेक जागृत राहून वेळोवेळीं उद्भवणाऱ्या मनोविकारांचें त्यांस बऱ्याच प्रकारें शमन करितां येतें. दुसऱ्यानें आपला अपकार केला असतां म्हणजे

आपल्या शरिरास इजा, आपल्या द्रव्याचा किंवा मालमिळकतीचा अपहार किंवा अपव्यय, अथवा कठोर शब्दांनीं किंवा कृतीनीं आपलें मन दुखविणें ह्या गोष्टी केल्या असतां, आपल्यास वाईट वाटणें किंवा क्षणएक क्रोध येणें हें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु ही क्रोधवृत्ति बळावूं देतां कामास नये, विवेकानें तिचें नियमन केलें पाहिजे; आणि दुसऱ्यानें केलेल्या आपल्या अपकाराचा शांतपणें विचार केला पाहिजे. न समजून झालेले अपकार तर विचारी मनुष्यानें एकंदर मानवी स्वभावाच्या दुर्बलतेकडे लक्ष्य देऊन अपकार कर्त्यास विशेष दोष न देतां सहन केले पाहिजेत. परंतु समजून उमजून केलेले अपकार सुद्धां उपकारकर्ता आपल्या कृत्यांविषयीं खिन्न झाला आहे असे दिसल्यास, किंवा सामोपचारानें तो आपला दुर्गुण टाकील असें दिसल्यास, सामोपचारानेंच त्याच्या अन्यायाविषयीं त्याची मती जागृत करून झालेला अपकार आपण विवेकानें सहन केला पाहिजे. कित्येकांस स्थूल दृष्टीनें क्षमा करणें हें दुर्बलत्वाचें लक्षण वाटतें, परंतु तसें नव्हे. अपकार करणारास वृत्तीवर आणण्याचा उपाय तर अवश्य योजिला पाहिजे. पण प्रत्येक अपकारास उलट अपकार करणें हें मोठ्या अनर्थाचें कारण होईल. यास्तव मनुष्यमात्रानें विचारानें, सुजनसंगतीनें, थोर पुरुषांच्या उदाहरणानें, आपल्या स्वतांच्या कल्याणाकडे तसेंच इतरांच्या सुखाकडे दूरवर लक्ष पोंचवून आपल्या आंगीं क्षमा—म्हणजे अपकार सहन करण्याची शक्ती—संपादिली पाहिजे. जे दुर्बल आहेत त्यांच्या आंगीं हा गुण असणें फारच आवश्यक आहे. कारण त्यांनीं जर अपकारांस प्रत्यपकार करण्याचें मनांत आणिलें तर बलवंतांपासून त्यांस वारंवार पीडा सोसावी लागेल. परंतु जर त्यांनीं विचारानें प्रथम अपकार सहन केला, तर पुष्कळ प्रसंगीं त्यांस जास्ती होणारी पीडा टाळतां येईल. म्हणून दुर्बलांचे आंगीं क्षमा हा गुणच मानिला पाहिजे. जे स्वतः अपकाराचा प्रतिकार करण्यास समर्थ आहेत त्यांचे आंगीं क्षमा हा नुसता उपकारक गुण नव्हे, तर त्यांस हें एक भूषणच होय असें समजावें. म्हटलें आहे,—' क्षमा गुणो ह्यशक्तानां शक्तानां भूषणं क्षमा । '

सत्पुरुषांनीं समयोचित क्षमा करून अत्यंत दुष्ट, दुर्वृत्त मनुष्यांसही आपल्या दैवी गुणानें आश्चर्यचकित व मोहित करून सन्मार्गास लाविलें आहे. थोर व उदार बुद्धीच्या पुरुषांनीं समयोचित क्षमा करून आपल्या द्वेष्ट्यांसही आपले अंकित करून टाकिलें आहे. अशीं उदाहरणें इतिहासांत सत्कार्यांत, व महच्चारित्रांत थोडीं आढळतात असें नाहीं. यास्तव—" क्षमाहि परमं धर्मः ।"

"क्षमा हें मोठें धन होय." ह्या जगामध्यें क्षमेनें सर्व लोक वश होतात. क्षमेनें काय साध्य होत नाहीं? ज्याच्या हातांत क्षमेचें खड्ग आहे त्याचें दुर्जन काय करणार आहे?" असें जें म्हटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. हा सामान्य लौकिकदृष्टीनें विचार झाला. आतां ज्यांच्या अंतःकरणांत धर्मबुद्धि जागृत होऊन ईश्वरनिष्ठा सिद्ध झाली आहे, ते पण ईश्वराचे अनंत अपराध करीत असतांही ईश्वर आपल्या ऐहिक सुखाची तरतूद कशी ठेवितो, व आपल्या पारत्रिक कल्याणाविषयीं काय काय उपाय योजितो, हें जाणून आपल्या अंगीं क्षमा संपादून, आपल्याकडून होईल तितका परसुखवृद्धीविषयीं व परदुःखपरिहाराविषयीं अवश्य यत्न करितीलच. ज्याच्या अंगीं क्षमा नाहीं त्यास धर्मनिष्ठ अथवा ईश्वरनिष्ठ कसें म्हणावें? एकनाथपंतांनीं आपल्या अंगावर एकवीस वेळ तांबूल-रस फेंकणाऱ्या यवन पाहरेकऱ्यास आपल्या सहनशीलतेनें व शान्तीनें कसें सन्मार्गास लाविलें बरें? तुकारामबुवांनीं आपला छळ करून आपल्यास काठ्यांनीं मारणाऱ्या ब्राह्मणास आपल्या क्षमाशस्त्रानें जिंकून आपल्या अनुयायांमध्यें कसें ओढून घेतलें? येशूनें आपल्यास निष्कारण वधस्तंभीं चढविणारांस, त्यांच्या घोर कृत्याबद्दल क्षमा करून त्यांचा अपराध पोटीं घालण्याविषयीं ईश्वराची किती काकुळतीनें प्रार्थना केली? या सत्पुरुषांचें नाम ऐकिलें म्हणजे आस्तिक्ययुक्त मनुष्यांच्या मनांत जी अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न होते ती या क्षमेच्या व शान्तीच्या योगानें. युधिष्ठिरास अजातशत्रु हें पद कशानें मिळालें? केवळ या क्षमागुणानें. अशा प्रकारची शान्ति व सहनशीलता ज्यांचे अंगी सिद्ध होईल ते खरोखर धन्य होत. परंतु सामान्य मनुष्यांससुद्धां वारंवार अभ्यासानें यथाशक्ति प्रयत्नानें हा क्षमागुण कांहीं अंशीं तरी साध्य करितां येईल यांत संशय नाहीं.

卐 卐 卐

# सत्यभाषण

अध्ययन समाप्त झाल्यानंतर आचार्यकुल सोडून आपल्या घरीं जावयास विद्यार्थी निघाला म्हणजे त्याची विद्यार्थिदशा जाऊन पुढें घरीं जी स्वतंत्र स्थिति प्राप्त होणार, त्या स्थितीमध्यें त्यानें कसें बर्तावें, लोकव्यवहार कोणत्या रितीनें करावा, व गृहस्थाश्रम घेऊन संसारकृत्यें कोणत्या प्रकारें करावीं, यासंबंधीं विद्यार्थ्यांच्या कल्याणांविषयीं चिंता वाहणाऱ्या गुरूनें त्यास ज्या आज्ञा करावयाच्या त्यांत पहिली आज्ञा "सत्यंवद" म्हणजे "सत्य भाषण करा" ही आहे, या आज्ञेस जें आद्यस्थान दिलें आहे तें अगदीं यथायोग्य आहे. कारण लोकांमधील सर्व अन्योन्य व्यवहार जे प्रायः निःशंक चालले आहेत ते परस्परांच्या भाषणांवर परस्परांचा विश्वास आहे म्हणूनच चालले आहेत. प्रायः

मनुष्यें एकमेकांशीं भाषण करितांना स्वभावतः सत्यास अनुसरूनच बोलतात; म्हणूनच लोकांचा एकमेकांच्या बोलण्यावर विश्वास राहातो. क्वचित् लोभादि मनोविकार बळावून, मनुष्यमात्रामध्यें जी स्वार्थपरता आहे, व जी मनुष्याला जीवितसंरक्षणास सामान्यतः आवश्यकही आहे, ती मर्यादेच्या बाहेर गेली म्हणजे लोभबुद्धीनें केलेलें आपलें दुष्कृत्य गुप्त ठेवण्यासाठीं, किंवा परवचनेनें आपलें अनुचित कार्य सिद्धीस नेण्यासाठीं, मनुष्य असत्य भाषण करण्यास प्रवृत्त होतो. कदाचित् कांहीं काळपर्यंत या असत्यमूलक व्यवहारानें मनुष्याचें कांही व्यवहारीक कार्यही साधतें; परंतु हा असद्व्यवहार निर्भयपणें पुष्कळ काळपर्यंत चालतो असें नाहीं. प्रायः लवकर म्हणा किंवा कालगतीनें म्हणा, असत्य बाहेर पडतेंच पडतें. असें झालें असतां असत्य भाषण करणाराचा लोकांमध्यें अत्यंत उपहास व तिरस्कार झाल्यावांचून राहात नाहीं. क्वचित् स्थूलदर्शी लोकांनीं त्याचा कांहीं मान राखिला तर ते केवळ बाह्योपचारानेच राखितात. मनापासून राखीत नाहींत. हें असत्य भाषण करणाराच्या ध्यानांत आल्यावांचून फार वेळ राहात नाहीं. याप्रमाणें लोकांमध्यें असत्य भाषण करणारा मनुष्य अपमानास पात्र होतो मग असत्य भाषणानें संपादिलेल्या द्रव्यादि विषापासून त्यास सुखप्राप्ती कशी होऊं शकेल ! मनुष्यजातीच्या प्राण्यांस संसारांत लोकेषणा म्हणजे लोकप्रीति सर्वप्रकार आवश्यक आहे. आपण सर्व मनुष्यें प्रायः अनेक प्रकारें एकमेकांच्या साहाय्यावर अवलंबून असल्यामुळें लोकांची आपल्याविषयीं प्रतिकूलता आपल्यास पदोपदीं पीडाकारक किंवा निदान खेदकारक तरी होते; म्हणून प्रायः लोकांमध्यें मान्यता संपादन करण्याविषयीं मनुष्यमात्र उद्युक्त असतो. परंतु असत्याचा कलंक ज्यास लागला आहे त्याचीं अपकीर्ति लोकांमध्यें झाल्यावांचून रहात नाहीं. आणि—

**“ संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ”**

( म्हणजे ) संभावितास अकीर्ति मरणापेक्षांहि अत्यंत दुःसह होते. कधीं कधीं एका असत्य भाषणाची संपादणी करण्याकरितां पदोपदीं असत्य भाषण करावें लागतें. असें झालें म्हणजे तो सर्व असत्याचा व्यवहार कोणत्यातरी द्वारानें सर्वांना कळतो. मग असत्यमालिकेवर अवलंबून राहाणाऱ्या मनुष्याची जी दुर्दशा होते तीस पारावार नाहीं. एकदां मनुष्यास असत्य भाषणाची संवय लागली, व त्यापासून होणाऱ्या क्षणिक लाभाची लालूच लगली, म्हणजे त्यापासून होणाऱ्या भयंकर अनर्थपरंपरेचें मुळींच भान नाहींसें होतें. त्यायोगें तो एखाद्या वेळीं न्यायाच्या स्थानींही सत्यभाषणाची प्रतिज्ञा करून असत्य बोलतो, व कालवशात् प्रतिज्ञाभंगाच्या पेंचात सांपडून दंडास किंवा कारागृहवासास पात्र होतो. हा सर्व परिणाम एका असत्य भाषणाचा. कदाचित् एकादा

असत्य व्यवहार लोकांच्या दृष्टोत्पत्तीस न आला तरी असत्य भाषण करणाराची मनोदेवताच उग्र रूपानें त्याच्या मनापुढें निरंतर उभी असते; व त्यास भय, चिंता, पश्चात्ताप इत्यादि मानसिक क्लेश, जे बाह्य क्लेशाहूनहि अत्यंत दुःसह, व ज्यांच्या पीडेनें मनुष्य कधीं कधीं अत्यंत प्रिय जो आपला प्राण त्याचाहि त्याग करावयास सिद्ध होतो; ते अखंड भोगावे लागतात. मनुष्यास प्रथम वाटतें कीं, आपलें असत्य दुसऱ्या कोणास कळलें नाहीं म्हणजे झालें. परंतु सर्वजगद्व्यापक, सर्वसाक्षी परमात्मा आपल्या अंतःकरणांतील पुण्यपापें कितीहि सूक्ष्म असली तरी पाहतो, व तो आपल्या असत्य व्यवहाराचें कठोर शासन कधीं तरी करीलच करील, हें त्याच्या ध्यानांत येत नाहीं. परंतु त्याची मनोदेवता भयंकर रूपानें त्यासमोर उभी राहिली, म्हणजे मग त्याचे डोळे उघडतात.


"नास्ति सत्यसमो धर्मो न सत्याद्विद्यते परम्"

'सत्यासारखा दुसरा धर्म नाहीं, सत्याहून कांहीं श्रेष्ठ नाहीं,' हेंही सर्वथा निर्विवाद आहे. सत्य भाषण करणाराचें मन किती शांत, निश्चित, किती निर्भय असतें व त्याची बुद्धि किती प्रांजळ, त्याची मुद्रा किती सोज्ज्वल, आणि त्याचें वर्तन किती सरळ असतें! सत्य हें परमेश्वराचें नाम. सत्य हें ज्ञानाचें सार. सत्य हें बुद्धीचें स्वरूप, मनाचें शुद्धिसाधन, वाणीचें तप होय. असा ज्या सत्याचा महिमा त्याचा अपलाप करणारा चोरांमध्यें गणण्यास योग्य होय.

"जो मनांत एक असून बाहेर दुसरें सांगतो तो आत्मपहारी जाणवा. त्यानें कोणतें पाप केलें नाहीं!" यास्तव कायावाचामनेंकरून सत्य भाषण करणें हें शिरोव्रत मानून त्याचें निष्ठेनें परिपालन करावें.

"सत्यमेव जयते । नानृतम् ।
सत्येन पंथाविततो देवयानः ॥"

कधीं ना कधींतरी सत्याचाच जय होतो; असत्याचा अखेरीस कधींही जय होत नाहीं. सत्याचेच योगानें देवलोकाला जाण्याचा मार्ग मोकळा होतो. म्हणून ज्यास आपलें ऐहिक व पारत्रिक कल्याण व्हावें अशी इच्छा आहे, त्यानें आपल्या सर्व व्यवहारांत नित्य सत्याचेंच अवलंबन करावें.



# लाखा कोल्हाटी

'लाखा कोल्हाटी' हें संतकवी दासगणू महाराजांच्या उत्तम आख्यानांपैकीं वरच्या दर्जाचें आख्यान असून, यांतील संविधानक फारच बहारीचें आहे. एक उत्कृष्ट चित्रपट तयार व्हावा, अशी नाट्यमयता महाराजांनीं हें कथानक रचितांना निर्माण केली आहे, पण या आख्यानाचें महत्व त्यांतील रंगदार कथानकांत नसून लाखानें विपरीत परिस्थितींतहि सदाचार कसा निष्ठेनें सांभाळला यामुळें आहे.

कोल्हाट्याच्या जातींत उत्पन्न झालेला लाखा हा परमेश्वराचा फार श्रेष्ठ भक्त होता. चिखलांत उगवलेलें कमळहि ज्याप्रमाणें देवाला वाहिलें जातें, त्याप्रमाणें लाखाची योग्यता होती. महाराज म्हणतात—

"उच्चनीच हें न ये ठरवितां जातीवरून यासाठीं ।
'दासगणू' म्हणे सुज्ञ खोबरें घेऊनि त्याजि नरवंटी ॥"

लाखाच्या घरीं दारिद्र्य अठराविश्वें ! परंतु त्याची मुलगी अत्यंत सुंदर होती. ती ज्या वेळीं वयांत आली, त्यावेळीं लाखाला ती कशीं निघेल याविषयीं मोठा धाक वाटूं लागला. तो मुलीला म्हणाला 'हें तुझें तारुण्य म्हणजे गळ्याला लागलेली तात वाटते. किंवा तुझ्या निर्मल वासनांना हा जणुं साप चावावयास आला आहे, असें वाटतें.' लाखा देवाचीं प्रार्थना करी व म्हणे, 'परमेश्वरा, आम्हां गरिबांच्या घरीं इतकें सौंदर्य काय कामाचें ? तूं हा पारिजातकाचा वृक्ष उकीरड्यावर लावला आहेस.' मुलीला या बोलण्याचा राग येई. ती समुद्रावर जाऊन गात बसे. तिचा कंठहि मोठा मधुर होता. गरिबी, सौंदर्य, तारुण्य आणि सुस्वर गायन — एकैकमप्यनर्थाय, किमु यत्र चतुष्टयम् ?—अशीच ही अवस्था नीतीपासून न ढळणें, हें अशा परिस्थितींत दुर्घटच. लाखाच्या मुलीच्या स्वरमाधुर्यानें मोहित झालेला, एक राजपुत्र तिला म्हणाला, 'तूं माझ्याशीं विवाह कर, कीं तुझें हें दारिद्र्य संपलेंच म्हणून समज., मुलगी म्हणाली, 'तुझें माझें जमायचें कसें ? आपणां दोघांच्या योग्यतेंत मोठें अंतर आहे. हंसाला मोत्यांचाच चारा हवा, त्यानें किडे खाऊं नयेत.' राजपुत्र म्हणतो, 'छे ! या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं. मोठ्यांनीं कांहींहि केलें तरी तें चांगलेंच दिसतें. शंकराच्या अंगावरची राख अन् नेसूची लंगोटी यांना कोणीं नांवें ठेवलीं आहेत काय ?' 'देवादिकांच्या गोष्टी कशाला कराव्या ?' मुलगी म्हणाली. राजपुत्र— "शंतनु राजानें एका कोळ्याच्या मुलीशीं लग्न केल्याचें तुला माहीत आहे ना ?" मुलगी—"मग त्याप्रमाणें माझ्या बापाची परवानगी घेतली पाहिजे. मीहि स्वतंत्र नाहीं." राजपुत्र—"अग, प्रेमविवाहांत बापाच्या परवानगीची

काय जरूर ? शकुंतलेनें दुष्यंताशीं विवाह केला, त्यावेळीं कुठें कण्वाला त्याचा पत्ता होता ? सावित्रीनें तर बापाची सूचना धुडकावून लग्न लावलें.”

या संवादातून मतलबाकरितां पुरावे कसे गोळा केले जातात, याचें उत्तम दिग्दर्शन महाराजांनीं केलें आहे. मुलगी घरीं निघून आली. राजपुत्रानें लाखाचा खेळ पहाण्याच्यां मिषानें पुन्हां संधान बांधलें. राजपुत्राच्या ऐश्वर्याला भाळून मुलगी त्याच्याबरोबर निघून गेली आणि ती निघून गेल्यामुळें लाखाचे खेळ बंद पडले अन् त्याला उपवास घडूं लागले. त्या वेळीं परमेश्वराला मोठें दुःख झालें आणि त्यानें लाखाला स्वप्नांत येऊन सांगितलें कीं तूं अयाचितवृत्ती स्वीकार.’ त्यासरशीं लाखा ताडदिशीं उठून बसला अन् निग्रहानें म्हणाला ‘दुबळेपणामुळें जे स्वतःच्या पोटाचा व्यवसाय करूं शकत नाहींत, अशा लुळ्यापांगळ्यांनीं लोकांच्या दयेवर जगावें विद्याभ्यास करण्यासाठीं ज्याला वेळ मोकळा हवा, अशा ब्रम्हचाऱ्यानें माधुकरी मागावी जगताचें मंगल व्हावें म्हणून धर्माचरणांत सदैव निमग्न असणारे, अग्निहोत्री व संन्याशी यांनीं अयाचित घ्यावें...पण देवा,—

“मी लुळा, खुळा, संन्यासीहि नसे।
सेवुं तें अयाचित देवा, मग कसे ?॥
करूनियां खेळ बाजारिं, खाइन भाकरि, ती न मिळे तरी–मरेन उपवाशी॥”
गणु म्हणे ‘पटेना अविधि कृत्य संतांशीं॥’

‘स्वधर्मे निधनं श्रेयः’ हें तत्त्व लाखाला कळून तें त्याच्या जीवनांत पूर्णतया मुरलेलें होतें. रुक्मिणीनें शेवटी विचार केला कीं, लाखाची मुलगी आता संपन्न झाली आहे. मग तिच्याकडूनच तर कांहीं मदत मिळाली, तर लाखाचें बरे चालेल. त्याप्रमाणें आतेच्या रूपांत जाऊन देवीनें मुलीची खूप कानउघडणी केली. स्वतःच्या सुखांत रमून म्हाताऱ्या बापाची उपेक्षा केली म्हणून मुलीची खूप निर्भर्त्सना केली. मुलगी म्हणाली, “आत्या, मी बापाला विसरलें नाहीं, पण तो म्हाताराच हट्टी आहे, एका लाकडाच्या बाहुलीला जगदीश्वर मानून त्याच्यापुढें ऊर बडवीत बसतो. माझ्या घरीं आल्यावर केवढा मानसन्मान होईल त्याचा ?

“तो येत नाहीं, तर तूंच जाना त्याच्याकडे !”

“भलतंच कांहीं तरी ! त्याच्याकडे जाण्यांत माझ्या इभ्रतीचा अपमान नाहीं का ? भिकार हलकाऱ्याकडे का राजानें जायचें ?”

मग रुक्मिणी अगदीं संतापून गेली आणि म्हाणाली, “अक्षर बोलूं नकोस आतां कळली तुझी किंमत. तुझी आणि लाखाची तुलना आहे काय ? कुठें लाखा, नि कुठें तूं ? संपत्तीनें का मनुष्याची योग्यता वाढते ?—

“पांच हिरे मीतीं–शौचकूंपाप्रती–म्हणुन कां तो योग्य बैठकीला ?”

मुलीची अशा रीतीनें चांगली पाद्यपूजा करून रुक्मिणी निघून गेली. त्यामुळें


मुलीनें आपल्या हुजऱ्याबरोबर कांहीं मोहरा व उंची वस्त्रें बापाकडे पाठविलीं, पण लाखाची धर्माधर्माची कल्पना फारच सूक्ष्म होती. मतलबसिंधूच्या आधारें पुरावा शोधीत, परिस्थितीच्या नांवानें कांगावा करीत, स्वार्थी दुर्वर्तनावर ढोंगाचें पांघरूण घालणें, त्याला अजीबात पसंत नव्हतें. मुलीकडून पैसे आलेलें पाहतांच तो म्हणाला—

" खाऊन मुलीची भाड कशाला जगुं या जगतांत ?
मला पोशील जगन्नाथ ! "

अन् त्यानें आपल्या मुलीला कळविलें—

" पोसावें असें वाटल्या तुझ्या मनिं आपुल्या बापाला ।
येई तूं खेळ करायला ।
जोंवरी तनूला मांस–तोंवरी खास असे चाळे ।
चालतिल जगामध्यें बाळे ॥ "

' उत्तम वेव्हहारानें धन जोडावें, यांतल्या उत्तमत्वाची कल्पना किती सूक्ष्म आहे, हें अशा संतांच्या वर्तनाव्यतिरिक्त इतरत्र प्रत्ययास येणेंच शक्य नाहीं. लाखाच्या या निस्पृहतेमुळें आणि निष्ठेमुळें परमेश्वर स्वतः वेष बदलून लाखाची सेवा करूं लागले.



ईश्वराला मानणारा माणूस हा आपल्या हातांत तलवार असूनहि ती दुसऱ्यावर चालवत नाहीं. कारण त्याला माहीत असतें कीं, प्रत्येक माणूस ही परमेश्वराचीच मूर्ति आहे'

मौन हें सर्वोत्तम भाषण आहे. तथापि बोलायचें असलेंच तर कमीत कमी व्हावयाचें असलें तर द्रोन शब्द वापरूं नका.

**म. गांधी**

ह. भ. प. संत दासगणू यांचा

# सुक्ति संग्रह

श्री साईबाबांचे परमभक्त ह. भ. प. संत श्री. दासगणू महाराज यानीं संत-चरित्रपर विपूल लेखन केलें आहे. आधुनिक काळांतील ते संत महिपतीच होत. त्याच्या विपुल वाङ्मय वाटिकेंतून निवडलेलीं कांहीं बोधवचनें.

१ विश्वचि माझें घर । ऐसें बोलिले ज्ञानेश्वर
या ओवीचें प्रत्यंतर । एक दिसे संताठायीं ॥
२ त्यासीच म्हणावें संत । कीं जो न मानी जात गोत ।
३ त्रिभुवन हेंच पंढरी । मेदिनी ही वीट खरी ।
विश्वात्मा तो श्रीहरी । विटेवरी या उभा असे ॥
४ संताची ती करितां स्तुती । प्रसन्न होतो रुक्मिणीपती ।
संतसेवेविण जगतीं । साधन आन नसते ॥
५ द्रव्यहीना भूमीवरी । मान कोणी न देतात ॥
६ पहा एका द्रव्यापुढें कोण पाहे हरीकडे ।
कामुक भक्तांचे वाकडे । सहज शुद्ध ब्रह्मासी ॥
७ नामीं विश्वास ठेवावा । कवचाही न करी हेवा ।
अवघ्या भूतीं पंढरीरावा । पाहून लीन असावें ॥
८ सत्तेसाठीं सदसद्विचार । लोप पावे प्रथमतः ॥
९ सगुणावांचून निर्गुण । आलें न कोणा कळून ॥
१० धर्माधर्म आपणाकरितां । नाहींत ईश्वराच्या भक्ता ।
कायदेकानू भूपाकरितां । असती कोणत्या देशांत ॥
११ सत्य भूतदया उपरती । समाधान चौथें निश्चितीं ।
याच चारीला बोलती । धर्मअंगें ज्ञातेजन ॥
१२ जया कुळीं जन्म झाला । त्या कुळीच्या व्यवसायाला ।
करण्या खऱ्या संताला । लाज मनीं न वाटतसे ॥
१३ अनुभवी संत अवतीर्ण होतां । धर्मश्रद्धा बळावते ॥
१४ दरबार ज्याचा मोकळा । त्याचाच जगीं बोलाबाला ॥
जेथें लाग वशिला । त्याचें दैन्य लवकर पुढें ॥
१५ भक्तिमार्गाचें लक्षण । जग आणि जनार्दन ।
एक परी जागृत पूर्ण । सेव्य सेवकता ते ठायां ॥

१६ खोडी कराया चित्तें घेतलें । तरी ती करावी थोरासी ॥
१७ वादविषय पंडितासी । रणमैदान शूरासी ।
तैंवी संतती स्त्रियांसी । ब्रह्मस्थानीं वाटते ॥
१८ वैदूर्य मण्यांची माळा । कोठून पटावी रासभाला ।
कस्तुरीच्या सुवासास । काय कुत्रें हुंगील ॥
१९ रिता डेरा घुसळल्यावर । शीण मात्र पदरीं पडे ॥
२० नाटकाचे पडद्यावर । असे रंगाचा दिनकर ।
परी उजेडार्थ साचार । दीप लावणें भाग असे ॥
२१ हांसत कर्म करावें । तेंच रडत भोगावें ॥
म्हणून आधींच उमजावें । कर्म करतां सूज्ञांनीं ॥
२२ स्त्रिया असल्या सुशिक्षित । बालकें होती पण ॥
२३ ज्यांनीं ऐहिक टाकिलें । त्यांना न कोठें भय उरलें ॥
२४ शिष्य नसावा सापेक्षित । गुरू नसावा आशाळभूत ॥
२५ अस्ता गेल्या भास्कर । ये दीपासी महत्त्व थोर ।
तैसें कर्म, भक्ति, ज्ञान दूर । झाल्या ज्योतिष बळावतें ॥
जैसें दुष्काळ पडल्या देशीं । भाव कुचक्या धान्यासी ।
येतो, तैसे ज्योतिषासी । भावाभावीं महत्त्व ये ॥
२६ लहान मुलाचें संगोपन । करूं जाणती स्त्रियाच जाण ॥
२७ गाड्या न वंगण घालितां । तो जड जाय ओढूं जातां ।
तैसें देहा चालविण्याकरितां । आरोग्य असे आवश्यक ॥
२८ मोठें होणें सोपें हरी । परी ते टिकविणें कठीण भारी ॥
२९ जो खराच सिद्ध झाला । दंभ न स्पर्शे कधीं त्याला ।
पहा मूळच्या सौंदर्याला । चट्टीपट्टीची गरज नसे ॥
३० सापेक्ष जेथें लक्षण । तें अवघें चोखटें ॥
३१ ज्याचें शुद्ध झालें अंतर । तो सोवळा कोठेंही ॥
३२ चित्त ठेवावें सानंद । मनीं ध्यावा गोविंद ॥
३३ गुरू प्रसन्न झाल्यावर । कां न भेटे ईश्वर ॥
३४ जातिद्रोह धर्मद्रोह । पंथद्रोह राजद्रोह ।
गोत्रद्रोह मितिद्रोह । हीं द्वारें अनर्थाचीं ॥
३५ निरिच्छा हीच श्रीमंती । आशायुक्त ज्याची मती ॥
तोच दरिद्री या जगतीं । सत्य सत्य त्रिवाचा ॥
३६ कनक, कांता, वतनदारी । हीं अनर्थाचीं द्वारें खरीं ।
जिवलग स्नेहामाझारीं । विपट आणती गोष्टी या ॥

३७ माय पावतां मरण । माहेर मुलीस पारखे ॥
३८ ऐसे असावें कलत्र । जें भर्त्यांस साह्य करीं ॥
३९ पंथी घातक आडवाट । समाजामाजीं जैसा नट !
वेदान्तवादी चावट । नसावा शेजार कसबिणीचा ॥
४० फाल्गुनीं फाल्गुनरावाला । आयुष्य पंचमीपर्यंत ॥
४१ गृहस्थाचा विवेक । सर्वकाळ टिकणें अशक्य ॥
४२ झरे असल्यावाचूनी । विहिरी न बनती कोठेंच ॥
४३ नुसतें शब्द पांडित्य । जें ठायीं वास करित ।
तेथें तया सांपडतात । पळावया पळवाटा ॥
४४ कैरीपरी कर्म जाण । कर्माचरण हें आंबटपण ।
भक्ती तेथें पाड पूर्ण । ज्ञान गोडपण पिकलेलें ॥
४५ साधक साधा असावा । राग मुळींच नसावा ।
वृत्तीचा न मावळावा । आनंद त्याच्या केव्हांही ॥
४६ खरे साधू खऱ्याप्रती । सदा वाचे गौरविती ।
४७ कर्म भक्तीच व्याख्याना । करण्या आहे योग्य जाण ॥
४८ न घडतां कर्माचरण । चित्तशुद्धी नोहे जाण ।
भक्ती न झाल्या पूर्ण होय उदय ज्ञानाचा ॥
४९ मानवाचें हें शरीर । योग्य न करण्या संसार ।
काय पोलादी तरवार । त्यावी भाजी चिरावया ॥
५० मधलें मोतीं गेल्यावर । सहज शिंपला उताणा ॥
५१ मर्कटांच्या मंडळींत । हिरागार सारखी ॥
५२ खऱ्या संता मानापमान । वाटतसे समसमान ॥
५३ चमत्कार झाल्याविना । साधू कोणास पटेना ॥
५४ कोणा न आवडे रायपुरी । साखर सांगा विबुध हो ॥
५५ हरिभजनावीण सुखद वस्तु ना खरी ॥
५६ मानसजल प्यायाला असल्या हंसास सहज तें माने ॥
५७ जिंकिल पंचानना कुठूनी । किती माजला जरी कोल्हा ॥
५८ मातेस शिशु जरि प्यारें । परि आड आल्या कापिती ।
जीं येति सरळ मार्गानें । तीं अंकावर खेळतीं ॥
५९ अवघा समाज एकव्यक्ती अनंत व्यक्ती अवयव ते ॥
अवयव धर्मी दुही माजल्या सौख्य कुठून मम देहातें ॥

# नामदेवांचीं वाणी

( अनुवादक : गणेश विष्णु काविटकर, एम्. ए. )

: ३० :

## हम तों भूले ठाकुर जाने !

आम्ही चुकलो किंवा काय झाले हे ईश्वर जाणतो पण हे बांधवांनो ! तुम्ही वेडे त्या अश्वत्थाचे त्याचे मागे कां लागता ? ओढा हा स्वतःच्या शक्तीनें समुद्राला मिळून समुद्र झाला आहे. तेव्हां ज्याला गति नाहीं व जो एक ठिकाणीं अडकून राहिला आहे अशा अडानें कां त्याचा मत्सर करावा ? चंदनाच्या सहवासांत निंबवृक्ष चंदन झाला म्हणून हिंगाच्या झुडुपानें कां रडावे ? गुरूच्या कृपेनें नामदेवांना उपरति झाली आहे व ते साधु झाले आहेत हे पाहून हे स्वार्थी लोक त्याचा विनाकारण मत्सर करीत आहेत.

: ३१ :

## पायो राम रतन धन भाई ।

हे बंधो ! ज कधींहि मलीन होत नाहीं अगर गंजून जात नाहीं अशा रामरुपी रत्न—धनाची प्राप्ति करुन घे. नामरुपी जहाज, भक्तिरूपी नावाडी यांच्या सहाय्यानें मी भवसागर तरुन आलों. सद्गुरु कृपा आणि संत संगतिही मोठ्या भाग्यानें प्राप्त झाली. त्या धनाला अग्नि जाळूं शकत नाहीं कीड लागत नाहीं, जमीन त्याला पोटांत घेऊं शकत नाहीं. तें धन खाल्ल्यानें अगर खर्च केल्यानें कमी होत नाहीं. सद्गुरुनें अशा धनाची प्राप्ती कशी करून घ्यावी ही कला दाखवून दिली. नामदेव म्हणतात, प्रभु गोपालास सोडून तूं दुसऱ्या कोणाचाहि शोध घेशील तर मला परमेश्वराची आण आहे !

३२

## राम मंत्र जप, राम मंत्र जप

शंकर पार्वतीनें ज्याचें ध्यान केलें अशा त्या रामनाम मंत्राचा जप कर. काशी-

---


६० पुण्यावांचून सुख तें नाहीं कुतर्क घेऊं नका बळें ।
६१ आपुल्याच्यानें होईल ऐसें काम कुणाला सांगुं नको ।
६२ निज वचनाला यत्किंचितही नच विसरावे कदा ॥
६३ दासगणु म्हणे परमेशाला न रुचे दांभिकपणा ॥

पुरींत सर्वांना जीवन देणारा शंकरहि नाम घेतो. खर राक्षसानें देखील न भितां त्या रामाला मी तुझा दास आहे म्हणून त्यांचे नांव घेतले आणि तो विष्णुपद प्राप्त झाला. रामनामानें गज व गणिक तरून गेलीं. अजामिळाला स्थान प्राप्त झाले. जो रामकृष्णाचें नांव घेतो त्याला अंतःकालाचे भय ग्रासूं शकत नाहीं. राम-नाम घेत अहिल्यातरून गेली. द्रौपदीला वस्त्रे चढविली. त्याच नामामुळें प्रल्हादाची सुटका झाली. ध्रुवाला अढळपद प्राप्त झालें. रामराम घेऊन प्रतिज्ञापूर्वक लंकेला जाऊन हनुमानानें अंगठी सीतेला दाखविली सेवक नामदेव सीतेचा पति आणि भूषण असलेल्या त्या प्रभु रामचंद्राचे गुण गात आहे.

## : ३३ :

## आरती कीजै राजा राम रीझै

प्रभु रामचंद्राची आरती करा तो प्रसन्न होईल. भगवंताची भक्ति करा म्हणजे यमराज कांहीं त्रास देणार नाहीं; कालिया नागनाथ गोयाळकृष्णाची फुलांच्या माळेनें पहिली आरती; कंसाचा वध करणाऱ्या, संताचे उद्धरण करणाऱ्या देवकीपु श्रीकृष्णाची दुसरी लोकांवर प्रेम करणारा व गरूड सिंहासनावर शोभणाऱ्या प्रभु रामचंद्राची तिसरी आरती ज्याची जगांत चोहोकडे पूजा केली जाते आणि ज्याच्या खेरीज अन्य कोणी नव्हीं अशा त्या परमात्म्याची चौथीआरती प्रभु रामचंद्राचे यश नामदेव गातात अशा प्रकारे केलेली पांचवी आरती प्रभु रामचंद्रांना आवडते.



परमेश्वराचें दर्शन डोळ्यांनीं होत नाहीं, श्रद्धेनें होतें कारण ईश्वर निराकार आहे.

**महात्मां गांधी**

चुकणें हा मनुष्याचा स्वभाव आहे परंतु आपली चूक कबूल करुन, पुन्हा तशी गोष्ट आपल्या हातून घडूं न देणें हें शूराचें लक्षण आहे.

ईश्वराला खूप नांवें आहेत. कारण त्याच्या लीला अगणित आहेत म्हणून.

**म. गांधी**

---

# श्री साईबाबा व चांदोरकरादि भक्त

(ले. द. शं. टिपणीस)

## लेखांक ४

## संसार

### संसाराचे प्रकार—प्रारब्ध-सुख-दुख-संसाराचा अध्यात्मिक उपयोग

**********************

[चांदोरकर, निमोणकर, बेदरे आदी निवडक भक्तांची बैठक. बाबांचा हा सारा दरबार. असे खास दरबार शिर्डीला भक्तांची गर्दी होण्यापूर्वी मशिदींत होत असत. त्यांतील एका बैठकीची हकीगत. या बैठकींत संसार म्हणजे काय, त्याचें प्रकार त्याचें मूळ, तो सोडतां येत नसल्यामुळे अध्यात्मिक प्रगती साधून घेण्यास त्याचा उपयोग कसा करावा वगैरे महत्वाच्या गोष्टी बाबानीं आपल्या भक्तांना समजावून दिल्या. संसार करून परमार्थ कसा साधावा याचे मार्गदर्शन या बैठकींत बाबानीं केलें आहे.]

गृहस्थाश्रम स्विकारताना तरूण मनाला केवढा उत्साह व आनंद वाटत असतो! किती आशा आकांक्षा बाळगून व पंचवार्षिक योजना आकारून तो ब्रह्मचर्याश्रम सोडून गृहस्थाश्रमांत पदार्पण करतो! भावी आयुष्याची सुख स्वप्नें त्यास पडत असतात. त्या स्वप्नांच्या मार्गांवर कल्पनेच्या धाग्यांनीं भावी आयुष्याचे विणलेलें व आशांनीं रंग भरलेले एक सुंदर वस्त्र अंगावर घेऊन तो बोहल्यावर चढतो. मोठ्या थाटामाटानें उत्साहाने विवाह उरकून ५–५० लोकांना खुष करतो. नातेवाईक इष्टमित्र तोंडभर आशिर्वाद व गुंजभर आहेर करून त्याचा उत्साह द्विगुणीत करतात. सर्व स्थिर-स्थावर झाल्यावर खऱ्या संसारास सुरवात होते. थोड्याच कालावधीत त्याला जाणीव होते कीं जिला आशा म्हटले तें मृगजल आहे. योजना म्हणजे हवेंतील किल्ले आहेत. स्वप्न म्हणजे विरघळणारा बर्फ आहे. विणलेले वस्त्र हें वस्त्र नसून अंगाला रुपणारी एक जाडी भरडी घोंगडी आहे. हा सगळा संसार म्हणजे एक

घोंगडच आहे. वाटलें काय व झालें काय हाच विचार त्याच्या मनांत येतो. उद्यानं म्हणून शिरलो तर तें काटेरी रान ठरलें. सुंदर फुल झाडांपेक्षा चिंता काळज्या, कष्ट, हाल वगैरे काटेरी झुडपेंच जास्त. सुखापेक्षां संसारांत दुःखच अधिक. पहिलें प्रेम, पहिला हुरुप पहिली ताकद अत्तराप्रमाणें केव्हांच उडून जातात. यामुळें मी मीं म्हणणारे ही शेवटी जेरीस येतात. श्री चांदोरकरासारखे संपन्न, शिक्षित अध्यात्म जाणणारे व बाबांची कृपा असलेले भक्तश्रेष्ठही संसाराच्या कटकटीस कंटाळतात तेथें सर्व साधारण माणसाचा काय टिकाव लागणार ! श्री चांदोरकर संसारास इतके कंटाळले कीं शेवटी त्यांनीं बाबाना विनंति केली कीं

जों जों सुखाची हाव धरावी । तों तों दुःखाची स्वारी व्हावी ।
आशा सटवी नाचवी । ठायीं ठायीं आम्हांला ॥
शोधूं जाता संसारांत । सुखाचा ना लेश सत्य ।
मी कंटाळलो त्या प्रत । नको संबंध तयाचा ॥
चांदोरकरांनीं पदी माया । ठेवूनि आलेले तत्वता ।
हे साई महाराज समर्था । पुरे आतां हा संसार ॥

अ. ६२ भक्तीलीलामृत २ दास गणू

## संसार सोडतां येत नाहीं

परंतु संसार खरोखर सोडतां येणार आहे काय ? जो जिवंत आहे तो कांहींना कांहीं तरी करणारच. जीवनाची क्रिया व करण्याची क्रिया या एकजीव आहेत. या मुळें आयुष्यभर आपण कांहीना कांहीं कर्म ही करीतच असतो. कर्म केलें कीं त्याचे फल आलेंच. कार्याला तें घेतलें पाहिजे. कारण तोच त्याचा धनी आहे. फल घ्यायचे म्हणजेच पुनः कर्म करायचे कीं पुन्हां फल आलेंच. एकदा गती मिळाली ती चालुच. तिला खंड नाहीं. आपला संसार आपणच निर्माण केला आहे. सुख दुःखें आपलेच कर्तृत्व आहे. मग संसार टाकून कां आपल्याला पळून जातां येईल ! समजा अर्धे फल खावून गेलोंच तरी राहिलेला भाग या ना त्या रुपांत खाव्याच लागणार आहे. अधिक पळण्याच्या कर्माचें फल त्यांच्या भरीस पडेल हें निरालेंच. प्रारब्ध आहे तोंपर्यंत संसार आहेच, कर्मगति थांबवलीत तरच संसार सुटेल. संसार अर्धवट सोडून जाणें म्हणजे आगीतून फोफाट्यांत पडणें आहे. यामुळें चांदोरकरांच्या विनंतीला बाबांनीं उत्तर दिलें—

तैं बाबा म्हणती हासत । तो तुझा तूंच केला निर्मित ।
मग आतां त्याप्रत । कंटाळून काय होतें ॥
तुझी आहे सत्यागिरा । परी चुकतोस वेड्या जरा ।

यावद्देह तावत् खरा । आहे संसार पाठीशीं ॥
तो न चुकला कोणाशीं । मग तूं त्या कैसा सोडीसी ।
तो तोडितां न ये मजसी । मीही त्यांत गुंतलों ॥

भक्तलीलामृत—दासगणू

## चार प्रकारचा संसार

संसाराचे चार प्रकार आहेत. भावनेचा संसार, इंद्रियांचा संसार, मानसिक संसार व कौटुंबिक संसार हे प्रकार अगदीं वेगळे नाहींत. ते एकांत एक मिसळलेले आहेत. त्यामुळें संसार म्हटला म्हणजे हे चारी एकदम येतात. फार तर संन्यास घेऊन चवथा बाजूस सारता येईल. पण राहिलेलें तीन कांहीं जीवंत माणसास सोडणार नाहींत. यांतील भावनेचा संसार मानवापाठीं लागलेलाच आहे. कामक्रोध मदमत्सरादि षड्रिपूंचा संसार हा भावनेचा संसार होय. या रिपूंचें तरंग उठतच राहणार. कारण त्यांना पोषक अशा बाह्य विषयांचा सदैव पुरवठा होत असतो. अशा कैक गोष्टी रोज घडत असतात कीं या षष्टकांना उत्तेजन मिळून सारथ्याच्या लगामालाही दाद न देतां ते उच्छृंखल होतात. संयम दमनाच्या लगामांनीं ते ताब्यांत ठेवून आपणांस पाहिजे त्याकामीं त्याचा चांगला उपयोग आपण करून घेऊं शकतों. संयमानें आपण त्यांना जिंकल्यास त्यांचा नाच थांबेल. एरव्हीं नाहीं. दुसरा प्रकार इंद्रियाचा संसार. हा कोणासही सुटत नाहीं. स्थितप्रज्ञांच्याहि पाठीशीं तो असतो. मनांत आणा वा न आणा इंद्रियें आपली नैसर्गिक कामें करणारच. त्यावर आपला ताबा नाहीं. दृष्टीदृष्टीचें काम करणारच. कान आहेत तोंपर्यंत ऐकण्याचें कार्य झाल्याशिवाय राहील काय? जगांतील दुःखे राजपुत्र सिद्धार्थाच्या दृष्टीस पडूं नयेत म्हणून त्याच्या वडीलांनीं खूप कोशीस केली तरी बाह्य जगांत आल्यावर सिद्धार्थाच्या दृष्टीपुढें आले ते त्याच्या डोळ्यांना दिसलेच व नको ते घडून आलेच. इंद्रियांच्या पुष्कळशा क्रिया अनैच्छिक असतात. पापण्या हालणें, हृदयाचें ठोके पडणें, रक्त प्रवाह चालू राहणें वगैरे क्रिया आपल्याला त्यांची, जाणीव न होता आयुष्यभर चालूच असतात. आपण कांहीं त्या ठरवून करीत नाहीं कीं थांबवूं शकत नाहीं, यामुळें इंद्रियाचा संसार कोणालाही सुटला नाहीं. तो करणें क्रमप्राप्तच आहे. त्याचा चांगल्या कामीं उपयोग करणें एवढेच काय तें आपल्या हातीं आहे. तिसरा संसार मानसिक होय. माणसाचे शरीर व्यापार स्थगीत असले तरी त्याचें मानसिक व्यवहार चालू असतात. मनाला स्थगीत करणेंही महा कठीण गोष्ट आहे. हे जोपर्यंत साध्य झालें नाहीं तोंपर्यंत त्याचा व्यवहार संसार हा चालूच राहणार. लहान बालकाला स्वस्थ बसवत नाहीं, काहींना कांहीं शारिरीक चळवळ ही त्याची चालूच असते तसेंच मनालाही स्वस्थ बसवत नाहीं. हल्ली जसें

घर रिकामे राहूं शकत नाहीं तसें मनही रिकामें राहूं शकत नाही कोणी नाहीं तरी बायबल प्रमाणें सैतान हा भाडेकरू येतोच. त्याच्या चळवळीचे आपण नियंत्रण केले नाहीं तर तें आपल्याला लहरी प्रमाणें काम करीत राहतें.

**मनाचे विचित्र व्यापार**

मन हें एक मोठे वास्तु शास्त्रज्ञ व महाकवि आहे. तें हवेंत किल्ले बांधू शकते व मनोरे रचूं शकतें. मनांत मांडे खाऊं शकतें व दिवा स्वप्नांत day dream रंगू शकते ज्या गोष्टींचा उपभोग इंद्रियद्वारा घेणे अशक्य होतें त्यांचा उपभोग मानसिकरित्या घेण्याचें सामर्थ्य त्यांच्यात आहे. यामुळें इंद्रिय दमन केल्यावरही पुष्कळ वेळा मनांत वासना घोटाळत राहतात व त्यांचा भोग चालूच राहतो. मनाच्या या चांगल्या वा वाईट संसारांतून मानवाची सुटका होणें दुरापास्त आहे. चौथा संसार कौटुंबिक नाती गोती संबंध व आपले बाह्यजगाशीं होणार नित्य संबंध या संबंधी बाबा सांगतात.

काम मोह मद मत्सर । यांचा जो कां परस्पर ।
संबंध तोही संसार ! आहे बापा शिष्योत्तमा ।।
डोळे पदार्थ पहाती । कर्ण ध्वनीतें ग्रहण करिती ।
रसना रसाते सेविती । याचेहि नांव संसार ।।
मनाच ज जे व्यापार । त्यांचेही नांव संसार ।
शरीर धर्म साचार । अवघे संसार रुपी बा ।।
दारा पुत्र कन्यादिकांसी । संसार म्हणती निश्चयें ।
तो मात्र ओखटा तुजसी । वाटूं लागला सांप्रत ।।

अ. ३२ भक्तलीलामृत

**स्वतःच विणलेलें वस्त्र**

आपल्या नित्याच्या व्यवहारांत संसार हा शब्द आपण चौथ्या प्रकारला उद्देशून वापरतो. त्यांत पहिलें तीन प्रकार अभिप्रेत नसतात. असें असलें तरी पहिले तीन प्रकार या चौथ्यांत समावलेले आहेत. कारण भावनाविरहीत इंद्रियाविरहीत वा मनाविरहीत असा संसार असूं शकत नाहीं. एवढेंच नव्हे तर चौथ्या संसाराला पहिले तीन बरेंच जबाबदार आहेत. यामुळें संसार जिंकायला तर पहिलें तीन अगोदर जिंकणे अवश्यक आहे. परंतु ही महाकठीण गोष्ट आहे. कोळी जसें स्वतां भोंवतीं जाळे विणून घेतो तसें हें संसाराचें जाळे आपणच आपल्या भोंवतीं विणून घेतले आहे व स्वखुषीनेच त्यांत अडकून पडलों आहोंत. पूर्व जन्मीच्या कर्मफलांच्या धाग्यांनीं स्वताच विणलेले हें वस्त्र ( देह ) आपण स्वतांच स्वताभोंवतीं

लपेटून घेतले आहे. त्यांतील धागे जोंपर्यंत जीर्ण झालें नाहींत, भोग पूर्ण भोगला गेला नाहीं तोंपर्यंत हें वस्त्र आपण टाकून देऊं शकत नाहीं. भाज्य व भाजक असल्या-खेरीज भागाकार होऊं शकत नाहीं. तद्वत भोगणारा व भोग्य असल्याखेरीज भोग होऊं शकत नाहीं. भागाकारच झाला नाहीं तर शून्य बाकी कोठून राहणार? तसेंच भोगच झाला नाहीं तर शून्य बाकी राहून हा चिकटलेला संसार सोडण्याची आशा तरी कशी करावी? आपल्या पूर्वकर्माला योग्य मिळावें म्हणून हा संसार आपण मांडला आहे. यामुळें संसार आपण सोडूं शकत नाहीं. फार तर कर्मफल बदल्यामुळें भोग्य बदलेला व त्याला अनुरुप असा संसार निर्माण करण्यासाठीं हा टाकून नव्या संसारांत आपण प्रवेश करूं शकूं. म्हणजेचें मृत्यु व पुनर्जन्म. जोंपर्यंत आपण कर्म करीत आहोंत तोंपर्यंत फल हें प्राप्त होणारच व तें आपणांस भोगावें लागणारच, हें क्रमप्राप्तच आहे. म्हणून बाबानी चांदोरकरास सांगितले.

संचित क्रियमाण पूर्वींचे। देहप्रारब्ध फळ त्याचें।
हेंच देहप्रारब्धजन्माचें। आहे मूळ कारण॥
हें देहप्रारब्ध भोगिल्याविण। न सुटे कवणा लागून।
तें भोगण्याकारण। प्राणी जन्म पावती॥

श्री भक्तलीलामृत दासगणू

जोंपर्यंत देहप्रारब्ध आहे तो पर्यंत आपणास संसार अजिबात सोडतां येत नाहीं, टाकतां येत नाहीं कीं त्यांतून पलायनही करतां येत नाहीं. असें केलें नव्हें करण्याचा नुसता प्रयत्न केला तरीही नवीन कर्मफल निर्माण होऊन भरीस भर मात्र होईल व आपण संसाराच्या जाळ्यांत आधिक गुरफटले जाऊं. बेफाम पुरामुळें फाफावत वाहणाऱ्या नदींत आपणास लोटणारा कोण हे जोंपर्यंत समजलें नाहीं व त्याचा बंदोबस्त केला नाहीं तोपर्यंत हिकमतीनें आपण जरी नदी बाहेर काठावर आलों तरी पुनः पुन्हां आपण पाण्यांत लोटले जाणारच. तद्वत या संसारांत आपणांस लोटणारा ओढणारा कोण हें कळले नाहीं व त्याचा पुरा बंदोबस्त केला नाहीं तोंपर्यंत संसारांतून बाहेर पडण्याचा आपण कितीही प्रयत्न केला तरी पुनः पुन्हां त्यांत आपण ढकले जाणारच. आपले प्रारब्ध आप-ल्याला संसारांत लोटीत असते ओढीत असते ढकलीत नेत असते. यामुळें हें प्रारब्ध म्हणजे काय व त्याचा बंदोबस्त कसा करावा हें कळल्याखेरींज आणि त्याचा पुरेपुर बंदोबस्त केल्याखेरीज आपल्या कपाळीचा हा संसार चुकणार नाहीं.

### कर्म नियतीचे नियम

कर्म नियतीचें नियम व कायदे मानवी कायद्यापेक्षां फार निराळे आहेत. खरी

सच्ची प्रामाणिक न्यायदेवता कोणी असेल तर ती कर्म नियतीच आहे. सोने जोखण्याचा धर्मांचा काटा एक वेळ एक लक्षांश गुंजभर मागेपुढें होईल पण कर्म नियतीचा काटा आकड्यांनीं शक्य होईल इतक्याही अंशानें मागे पुढें होणार नाहीं. दया माया वगैरे प्रकरणें या न्याय देवतेकडे नाहींत. वशिला, हात ओला करणें वगैरे गोष्टींना तिच्या दरबारांत थारा नाहीं. गरिब श्रीमंत ती जाणत नाहीं. लहान थोर ती मानत नाहीं साव चोर ती बघत नाहीं. कायद्याप्रमाणें न्याय देणारा (फल) ती घाबरत नाहीं. कीं दचकत नाहीं. कर्मांचा एक कायदा असा आहे कीं जे कर्म केलें जाईल त्याला फल दिलें जाईल. यामुळें अनंत जन्मातील अनेक फले आपल्या हिशेबी लागलेली असतात. त्यांत एकमेकांच्या उलठ सुलट अशी कित्येक फले असतात. दोन चार शिक्षा एकाच वेळीं भोगतां येण्याचा मानवी न्यायालयांतील कायदा या ठिकाणीं नसतो. अचें बला ५० रु. देणें आहे. व बचें अला ३० रु. देणें आहे, म्हणजे अनें बला २० रु. दिले की सर्व व्यवहार मिटला असा समजुतीचा व्यवहार कर्मनियतीकडे नाहीं. पुण्याची ४ फळें व पापाचीं तीन फळें म्हणजे सुखाची ४ व दुःखाची ३ यांची काटाकाटी होऊन राहिलेलें १ पुण्याचे सुखाचे फल भोगले कीं संपले असा बीजगणित शास्त्रांतील धनऋणाचा नियम कर्मनियतीला मान्य नाहीं. यामुळें प्रत्येक कर्माचें फल स्वतंत्र रीतीनें भोगावे लागतें. पुन्हां ज्या क्रमानें कर्म झालें त्या क्रमानें त्या त्या कर्मांची फळें एका मागोमाग भोगावी लागतात. यामुळें कित्येकांच्या मागें सारखे सुखच लागतें तर कांहींच्या मागे सारखें दुःखच लागतें. कांहींच्या नशिबी आळीपाळीनें सुखःदुख येते. चित्रगुप्ताच्या वहींतील हा जमाखर्च इतका गुंतागुंतीचा व अतर्क्य आहे कीं मानवी मनाला ते एक कोडेच होऊन बसले आहे. काळाचें जसें वर्तमान, भूत व भविष्य असें प्रकार आपण कल्पितो तसें कर्मफलाचेही प्रारब्ध, अनारब्ध व संचित क्रियमाण असें प्रकार कल्पितात. ज्या फलांचा भोग घेण्यास सुरवात झाली ते प्रारब्ध (देहप्रारब्ध) जी अजून भोगण्यासाठी खोळंबून आहेत ती अनारब्ध व जी फळे आपण भविष्यकालासाठीं साठवून ठेवतो आहोंत तें संचित क्रियमाण या संबंधीं बाबानीं चांदोकराना सांगितले—

सहजगतीनें जें जें घडे। तें तें देहप्रारब्ध रोकडे।
कर्मकरुनि जें जें घडे। तें न देहप्रारब्ध ॥
जहर पीतां घडे मरण। हें नोहे देहप्रारब्ध जाण।
हें कृतीचें फळ पूर्ण। कर्त्यालागी मिळतसे ॥
नायनाट करुनि धन्याचा। कारकून होय मालक साचा।
हाही देहप्रारब्धाचा। नोहे भाग शिष्योत्तमा ॥
त्यानें जो धन्याचा केला घात। तें जोडिलें पाप सत्य।
हेच पुढील जन्माप्रत। संचित क्रियमाण होईल ॥

शिवाय देहप्रारब्धेंकरून । जें लाधले होतें कारकूनपण
तें त्यानें शिल्लक जाण । ठेविलें पुढिले जन्मासी ।
एवंच पुढील जन्माची । केली तयारी त्याने साची ।
जन्ममरण यात्रा अशाची । कोठून सांग चुकेल । भक्तलीलामृत

**एक व्यवहारातलें उदाहरण**

या सबंधीं अधिक कल्पना येण्यासाठी नित्याच्या व्यवहारांतील एक उदाहरण घेऊं समजा एका गृहस्थास ५०० रु. पगार आहे. पगार मिळाला कीं तो तो बँकेंत शिल्लक टाकतो मग त्यांतून २०० रु. घरखर्चासाठीं काढून आणतो. तें संपलें कीं राहिलेल्या ३०० मधून आणखी काढून आणतो. येथें ५०० रु. हें संचित आहे खर्च हा फलभोग आहे. २०० रु. खर्चासाठीं हें प्रारब्ध व राहिलेले ३०० हे अनारब्ध आहे. कारण २०० रु. संपल्यावर त्यांतून खर्चासाठीं म्हणजे भोगासाठीं पैसे म्हणजे फल येणार आहे. पुन्हां असें कीं हा सर्व व्यवहार चालू असतां तो रोज ऑफिसांत जाऊन कर्म करीतच असतो. यामुळें त्याच्या हिशोबी येणारा रोजचा पगार हें पुढील महिन्यांत संचित होत असते. महिन्याची ही जी एकंदर संचित फलें (५०० रु.) तीं त्याला पुढें महिना अखेर मिळणार आहेत. हें त्यांचें संचित क्रियमाण महिना अखेर ते त्याच्या हिशोबी येऊन पडतील व त्यांतून पुढील महिन्याचा खर्च–भोग चालू राहतील. त्याच्या सर्व व्यवहाराचा चोख हिशोब बँक (चित्रगुप्त) ठेवील व वर्ष अखेर हिशोब होऊन शिल्लक रक्कम पुढील सालासाठीं जमेस धरली जाईल. हें जें carried forword तें संचित क्रियमाण होय. चालू वर्षी म्हणजे या जन्मी आपल्या हिशोबी आलेली पण ती भोगलेली फले ही आपल्या पुढील जन्मीची


# लहान मुलांच्या आंकडीवर

**जुनें आणि प्रसिद्ध औषध**

**जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी**

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

**कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.**

Carried forword म्हणजे संचित क्रियमाण होय. असा हा व्यवहार चित्रगुप्ताच्या बँकेंत चालू असतो. आपल्या व त्याच्या व्यवहारांत एक मोठा फरक आहे. आपण बँकेंत ज्याच्या नांवावर जास्त रक्कम शिल्लक त्याला भाग्यवान व श्रीमंत समजतो. व ज्याच्या नांवावर मुळींच शिल्लक नाहीं त्याला भिकारी व दुर्दैवी समजतों, परंतु कर्मांच्या बँकेंत उलट व्यवहार असतो. ज्याची पुष्कळ शिल्लक तो भिकारी व दुर्दैवी व ज्याची मुळींच शिल्लक नाहीं तो श्रीमंत व भाग्यवान, तेच मानवी रुपानें वावरणारे ईश्वर. एकंदरींत काय कीं कर्मामुळें फल व फलामुळें संसार. कर्म हेंच या संसाराचें मूळ. असे आहे तर मग तें मुळच उपटून फेकून दिले कीं हा संसार आपोआप नाहींसा झालाच कीं, मग तो आपल्या पाठीशीं लागणार कसा ? त्यांतून सुटका झालीच म्हणावयाची हा सहज विचार खरा वाटला तरी तसें होणे शक्य नाहीं. कारण कर्म टाकताच येत नाहीं. तें मूळ उपटणें अशक्य आहे.

## पूर्व संचित भोगलेंच पाहिजे

संचित हे भोगलेंच पाहिजे. तें भोगताना कर्म आलेंच. कीं पुन्हां फल आलें. कर्म व ही अविभाज्य आहेत. एक आलें कीं दुसरें आलेंच. असें हें एक विषारी वर्तुळ आहे. वर्तुळाचा आदि कां हातीं लागणार. असें असलें तरी वृक्ष कायम ठेवून त्याला फल न येऊं देण्याची व्यवस्था आपण करू शकतो. वृक्षाला मुळांत खच्ची केला की वृक्ष राहून त्याला फळें मात्र येणार नाहींत, असें वृक्ष आपण पहातोच. तद्वत कर्मगतवृक्षाच्या मुळास म्हणजे कर्मास अनासक्तीच्या औषधानें खच्ची केल्यास कर्म राहून फल मात्र येणार नाहीं असा सोपा उपाय श्रीकृष्णाने गीतेंत सांगितला आहे. संसार करतांना हेंच औषध हमेशा वापरावें म्हणजे आध्यात्मिक प्रकृति दणदणीत होईल. याचा उपयोग संसारांत कसा करावा याचें प्रात्यक्षिक बाबांनीं वेळोवेळीं 'अल्लामियाचा खेळ' अल्लामालिक, मागें मशिदीतील फकीर मागें वगैरे उद्गार काढून दाखविलें आहे. अशा उपायानें आपलें संचित क्रियमाण कमी कमी करीत जाणे, बँकेंतील आपली शिल्लक शून्यावर आणून ठेवणें हाच संसार सुटण्यास उपाय आहे.

## सुखदायक फळ पाहिजे

कोणासही संसार नकोसा वाटतो तो कां ? कर्मफल मिळते म्हणून नव्हे. सुखदायक फले कोणास नकोशी आहेत ? ती सर्वांना पाहिजेत. दुःखदायक फले मात्र नकोत. संसारांतील सुखदायक भाग हवासा वाटतो पण दुःखदायक भाग आला कीं आपण सर्वांस तो नकोसा वाटतो. पैसा 'घ्यायला' गोड वाटते पण द्यायला जड वाटते. सुख घेण्यांत गोडी आहे पण त्याचा मोबदला दुःख कडू आहे. सुखदुःखे एकमेकास चिकटलेली आहेत. एक घेतलें कीं मागोमाग दुसरें आपणास नको असतें. यामुळें संसारास

आपण कंटाळतो. संसार नको असें आपण म्हणतो तेव्हां आपल्या मनांत खरा अर्थ हाच असतो कीं संसारांतील दुःखे नकोत, सुख चालेल. सुख ठेवून दुःखाला लोटण्याचा वेडा प्रयत्न आपण करीत असतो. सावली ठेवून उन्हाला हाकलण्यासारखे हें आहे म्हणाना. संसारांत सुखापेक्षां दुःखेच अधिक आहेत असें आपणास वाटतें म्हणजे भासते. सुखाचे वर्ष महिन्यासारखे वाटते तर दुःखाच्या हालअपेष्टेचा महिना वर्षासारखा वाटतो. नाटक सिनेमाचा २।।–३ तासांचा काल केव्हां संपला तें कळत नाहीं तेच अभ्यासाचे २।।–३तास जाता जात नाहींत.घड्याळच हळू चालले आहे असे वाटते वा बंद पडले अशी शंका येते. गायनाची मैफल रंगली कीं उजाडलें केव्हां हें समजत नाहीं पण तेच आजारी माणसासाठीं जागत असतां रात्र युगाची वाटते. सुखाची झोंप लागली कीं रात्र कशी चुटकीसरशीं निघून जाते पण डास ढेकणांमुळें ही सुखाची झोप उडाली कीं रात्र संपता संपत नाहीं. हें अस संसारांत होत असतें. पुष्कळ सुख थोडे वाटतें व थोडे दुःख फार वाटते. सुखाचा पर्वत राईएवढा वाटतो तर राई एवढें दुःख पर्वताएवढें वाटते. कारण सुखदुःख मानण्यावर आहे सुखदुःख या कल्पना आहेत. मनाचें ते तरंग आहेत. म्हणून चांदोरकराना बाबांनीं सांगितलें कीं.

अरे सुख दुःख हें भ्रांतीचें । आहे पटल केवळ ।।
प्रपंचांतील जें जें सुख । तें तें नव्हे खरें देख ।
बळेचि त्याला प्रापंचिक । सत्य घेती मानून ।।
या सुखदुःखाचे तरंग उठती । जें जें कांहीं आपुल्या चित्तीं ।
ती अवघी होय भ्रांती । मोह तिचा वाहूं नको ।।

## सुख आणि दुःख

वास्तविक सुख म्हणून कांहीं चीज आहे व दुःख म्हणून कांहीं वाईट असें नव्हे.म्हटलं तर सुख म्हटलं तर दुःख अशांतल्या या गोष्टी आहेत.असें असले तरी कां सुखदुख भासावें हा प्रश्न शिल्लक राहतोच. त्याच्या उत्तरांतच ही काल्पनिक सुखदुःखे टाळण्याची गुरुकिल्ली आहे. सर्व दुःखाचें मुळ आसक्ती वा तृष्णा आहे. ज्याबद्दल आपण आशक असतो. जिची तहान आपल्याला लागलेली असते ती गोष्ट मिळाली नाहीं. कीं दुःख होतें. आशा भंग वाईट. तो झाला कीं दुःख होते. यामुळें दुःख टाळण्याचा सोपा उपाय म्हणजे कशाचीही आसक्ती न बाळगणें, तृष्णा लागूं न देणें, व आशा न ठेवणें. गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहींतर मोडून खाल्ली अशी वृत्ति ठेवावी. मिळाले तर मिळाले नाहींतर नाहीं, पर्वा नाहीं अशा वृत्तीच्या माणसाला दुःख करण्याचें प्रसंग फारसे येत नाहींत. असें असलें तरी थोडी फार आसक्ती तृष्णा व आशा असल्याखेरीज जीवन कार्य होणार नाहीं. यासाठीं कार्यापुरती आसक्ती ठेवण्याची शक्ति व कार्य झालें कीं ती काढून घेण्याइतकी अनासक्ती माणसामध्यें असली पाहिजे. आसक्ती व अनासक्ती ही दोन्ही सामर्थ्ये जरूर आहेत

व त्याचा संसारांत कौशल्यानें उपयोग करण्याचें चातुर्य माणसाठायीं असणें आवश्यक आहे.

" अत्यंत महत्वाची व अत्यंत कठीण अशी गोष्ट हीच आहे कीं कार्य करण्यास लागणारे आसक्तीचें बळ आणि त्यांतून बाहेर पडण्यास लागणारें अनासक्तिचें बळ ही समसमान असावीत. " ( स्वामी विवेकानंद ) यालाच अनासक्ती आसक्ती योग म्हणतात. याचें आचरण केल्यानें आपल्या हातून कार्य होतील एवढेच नव्हे तर सुखदुःखाचा आपणास स्पर्श न होता कर्मफलही आपल्या वाट्यास येणार नाहीं. परिणामी संचित क्रियमाणाची शिल्लक कमी कमी होत राहील. त्या दसऱ्या दिवशीं बाराच्या सुमारास सर्वांना घरीं जेवावयास धाडून भक्तांच्या कल्याणाची ६०० वर्षे बाळगलेली आसक्ती एकदम बाबांनीं तोडली व प्रयाण केले. त्यालां कारण हा योग घटकेंत राग तर घटकेंत प्रेम, भक्ताला जवळ येऊं देणें तर घटकेंत त्याला दूर लोटणें, केव्हां ऐश्वर्य स्विकारणें तर केव्हां ते दूर भिरकावणें वगैरे जे विरोधाभास बाबांच्या जीवनांत आपणास दिसतात ते या अनासक्ती योगामुळें. अनासक्ती आसक्तीचा हा धावता घोटा कसा वापरावा याचा कित्ता बाबानीं आपल्या जीवनांत दाखविला आहे. तो आपण गिरवींत राहिला तर सोन्याहून पिवळे होईल. हाच योग अगदीं साध्या भाषेंत सांगायचा झाला तर चांगल्या अर्थानें करून सवरून नामा निराला.

**दुःखाचें कारण ?**

गरज हें एक दुःखोत्पतीचें कारण आहे. जोंपर्यंत आपल्या गरजा भागत आहेत तोंपर्यंत सर्व ठीक असो , पण त्या भागेनाशा झाल्या म्हणजे दुःख व हालअपेष्टा निर्माण होत असतात. आज आपण आपल्या गरजा इतक्या वाढवून ठेवल्या आहेत कीं त्या पूर्णपणें भागविणें अशक्य झालें आहे. ही गोष्ट घडून येण्यांत व्यक्तीप्रमाणें समाज व राष्ट्र यांचाहि हात आहे. साधी रहाणी व उच्च विचारसरणी ( Plain living and high thinking ) हें अध्यात्मिक तत्त्व जाऊन त्याऐवजीं केवळ ऐहिक सुखासाठीं उच्च राहणी व शून्य विचारसरणीं हें तत्त्व स्विकारल्यामुळें आमच्या वाट्यांस या संसारांत सुखापेक्षां दुःख अधिक आल्यास नवल नाहीं व संसाराचा कंटाळा आल्यास आश्चर्य नाहीं. मानवी बुद्धींत तुलना करण्याची ताकद असल्यामुळें अनेक गोष्टींत आपण तुलना करीत असतो. तुलनेची दिशा चुकल्यास ती दुःखाला कारणीभूत होऊं शकते. आपल्या परिस्थितीची इतराच्या परिस्थितीशीं कळत वा नकळत आपण तुलना करीत असतो. आपण म्हणतो, 'देवा, मी प्रामाणिक म्हणून हा असा. आणि तो पहा. लबाड्या करतो तरी कसा सुखांत आहे. " यामुळें मनाला वाईट वाटते व दुःख होते. तुलना करतांना दुसऱ्या जवळ आहे व आपल्या जवळ नाहीं असें कांहीं आढळलें व नेहमीं असें

आढळणारच की आपल्यांतील उणीव आपणास भासूं लागते व ती भरून काढण्यासाठीं आपण प्रयत्न करतो. तो फसला, आशा भंग झाली कीं दुःख होतें. हें दुःख आपण निर्माण केलेलें असतें. तुलनेचा योग्य उपयोग केला कीं मनाला समाधान वाटून दुःख निर्मिती होणार नाहीं. कारण समाधान हेंच सुख आहे. म्हणूनच सदा आनंदी असावे व शांत असावें, बेफिकीर असावें, समाधानी असावे व शांत असावे असें बाबांनीं वेळोवेळीं सांगितलें आहे. एवढेंच नव्हे तर त्याचें प्रात्यक्षिकही त्यांनीं श्रीसाईचरित्रांतील अशी मंडूकाच्या गोष्टींत दाखवून दिलें आहे. गौरीची मालकी स्थापून तिचें पैसे स्वतः स्वाहा करण्याचा तुमचा डाव आहे असें वीरभद्र त्यांना म्हणाला तेव्हां बाबांना काय वाटले असेल ते बाबाच्याच शब्दांत ऐका.

परिसोनि हे तयाचे शब्द । झालों मी जागचें जागीं स्तब्ध ।
अल्लामियाची करणी अगाध । उगाच कां खेद करावा ॥

१७१ अ. ४७ श्री साईचरित्र

## बाबांची शांतता

तुमच्या आमच्यासारखा असतां व एकाद्यानें तुम्हीं पैसे खाल्ले असें आपल्या तोंडावर सांगितलें असतें तर आपण आकाश पाताळ एक करून आळी गोळा केली असती व कदाचित मारामारीपर्यंत पाळी आली असती. पण बाबा शांत राहिले. त्यांची समाधानी वृत्ति ढळली नाहीं. तुलना कशी करावी हेंही बाबांनीं दाखवून दिले आहे—

भक्तकणवा बाबांची वाणी । वदती झाली अति लीनपणीं ।
दासानुदास मी तुमचा ऋणी । निघाला दर्शना तुमचिया ॥
ही एक तुमची कृपा मोठी । झाली मज तुमचे पायाची भेटी ।
किडा मी तुमचे विष्ठेपोटीं । धन्य मी सृष्टी तेणेनी ॥

अ. साईचरित्र.

काय ही लीनता ! किती नम्रता ! किती विनय ! समाधान सुख पाहिजे असेल तर वरच्यांनें खालच्याकडे पहावे. गरीबानें आपल्यापेक्षां गरीब असतील त्यांच्याशीं तुलना करावी म्हणजे मन म्हणेल कीं देवा, खरंच या माणसापेक्षां तूं मला किती तरी अधिक दिले आहेस व मनाला समाधान वाटेल. श्रीमंतानें आपल्यापेक्षां अधिक श्रीमंत असतील त्यांच्याशी तुलना केल्यानें आपल्या श्रीमंतीचा गर्व न वाटून नसत्या अभिमानानें उद्भवणारीं दुःखे पदरीं येणार नाहींत. यामुळें ताठर वृत्तीला आळा पडून संचित क्रियमाणही थोडे फार हलके होण्यास मदत होईल. वरील सर्व गोष्टी थोडक्यांत स्वामी विवेकानंदाच्या शब्दांत सांगायच्या तर "आकुंचित भावना दुःखाचें माहेर घर असून सर्वव्यापी भावना हें सुखाचें वसति-

स्थान आहे." म्हणूनच सर्वांभूतीं परमेश्वर पहाण्याला आमच्या साधुसंतांनीं प्राधान्य दिलें आहे.

## आपणांस दुःखांत कोण लोटतें ?

कामक्रोधादी षड्विकार आपल्याला दुःखांत लोटण्यास कारणीभूत होतात. यास्तव त्यांना संयमानें व नियममनानें ताब्यांत ठेवणें जरूर आहे. षड्रिपूंचा पूर्ण नायनाट करणें योग्य होणार नाहीं. कारण त्यांच्यातही झाली तरी कार्य करण्याची ताकद आहे. चांगल्या कार्यी त्यांचा उपयोग करून घ्यावा. प्रेम उचंबळेच तर तें देवाबद्दल असावे. लोभ वाटला तर तो देवाबद्दल असावा. साधुसंताबद्दल वाटूं द्यावा. क्रोध असेल तर तो वाईटाबद्दल येऊं द्यावा. कोणतीही गोष्ट करताना सद्विचारानें करण्याची स्वतास संवय लावून घ्यावी. षड्विकारा-संबंधी बोलताना बाबा चांदोरकरादि भक्तांना म्हणाले कीं,

म्हणून आधी षडिपूतें । जिंकिले पाहिजे शिष्यवरा ।।
मग त्या षड्रिपुशक्तींचा । नायनाट होता साचा ।
लागत साधे तयाचा । तरंग उठविण्या मानसी ।।
परी या षडिपूंची । समूळ शक्ति न हरिता साची ।
गुलामत्वान्या जागीं त्यांची । करी अवध्यांची योजना ।।
मग या सहा गुलामावर । ज्ञानास करी जमादार ।
त्याच्याही वरी अधिकार । सद्विचार शक्तीचा ।।

भक्तलीलामृत

अशा प्रकारे अनासक्ति आसक्ति योगाचे आचरण केल्याने जरूर तेवढेंच ममत्व ठेवल्यानें, गरजा कमी केल्यानें, योग्य प्रकारे तुलनात्मक वागणूक ठेवल्याने, साधी राहणी व उच्च विचार सरणी आचरणांत आणल्यानें व षड्रिपूना जिंकून त्यांना चांगल्याकामी जुंपल्यानें संसारांतील दुःखे व फलदायक कर्मे कमी होतील व संचित क्रियमाणाला हळूं हळूं ओहटी लागून आज ना उद्यां या संसारांतून आपली सुटका होईल या सर्व गोष्टींचा धडा संसारांतच चांगला गिरवितां येतो, यामुळें व्यक्तिच्या उन्नतीच्या दृष्टीस संसाराची अत्यंत जरूरी आहे. यास्तव संसार सोडून जाणें म्हणजे अभ्यासाला कंटाळून शाळेंतून पळून जाण्यासारखें आहे.

## अध्यात्माचें विद्यापीठ

संसार हें अध्यात्माचे विद्यापीठ आहे. सगुण भक्तींत देवाकडे भक्त निरनिराळ्या दृष्टी कोनांतून पहात असतो. देवासंबंधी भक्तांच्या निरनिराळ्या भावना असतात. याला भाव असें म्हणतात. कोणाला देव म्हणजे कोणीतरी कुठें तरी बसलेला जगाचा शासन कर्ता असें वाटतें. कोणी समजतात की देव ही एक बडी असामी असून आपण यापुढें अगदीच किरकोळ हीन दीन दुबळे आहोत. कोणाची कल्पना अशी कीं परमेश्वर

म्हणजे सर्व शक्तिसंपन्न कोणी तरी त्याच्यापुढें आपला टिकाव लागणार नाहीं यास्तव नमून वागणेंच इष्ट परमेश्वराला भिऊन वागणें हें त्यांचे तत्व. त्यांच्या भक्तीत भीती असते. कोणी म्हणतात परमेश्वर म्हणजे हातपाय असलेला कोणी असें मुळींच नाहीं ती एक शक्ति आहे. कांहीं सांगतात निसर्ग हाच देव. अशा प्रकारें देवाकडे पहाण्याच। कोणाचा कांहीं तर कोणाचा कांहीं दृष्टीकोन भाव असतो. अध्यात्मांत चढत्या क्रमांकानें भक्तीचे सर्वसाधारण मुख्यतः पांच भाव मानतात, शांत, दास्य, सख्य, 'वात्सल्य व मधूर यापैकीं कोणत्या ना कोणत्या तरी भावांत भक्त देवाकडे पहात असतो व त्याप्रमाणें त्याची सेवा करीत असतो. सर्वांत खालची पायरी शांत भावाची भक्ति व सर्वांत श्रेष्ठ मधूर भक्ति. देव आपला कल्याणकर्ता, पालनपोषण करणारा आहे अशी भावना शांत भक्तींत असते. तो प्रसन्न झाला कीं आपणांस पाहिजे तें देतो. तो नवसास पावतो. म्हणून त्याची भक्ति करावी असें या भक्ताला वाटतें. कामापुरता मामा एवढीच भावना. या भक्तींत भक्त आर्त नसतो. देवाच्या भेटीची त्यास तळमळ नसतें, देवासंबंधीं त्याचें मन पूर्ण निर्विकारी असते. अशा प्रकारची भक्ति शांत भावाची असते. भक्तीची सुरवात याच भावापासून होते. यामुळें बहुसंख्य भक्त या कोटींत मोडतात. याच्यावरची पायरी म्हणजे दास्यभक्ती. देव श्रेष्ठ व आपण कनिष्ठ हा भाव या भक्तींत असतो. देवा भक्ताचें नाते धनी व चाकर असें असतें. यामुळें शारिरीक दृष्टया होईल तेवढी देवाची सेवा करण्याची दृष्टी दास्य भक्तींत असते. साई चरित्रांत उल्लेखलेले नेवासकर व राधाकृष्णाबाई यांची दास्य भक्ति होती. दास्य भक्तीच्या वरची पायरी सख्य भक्ति. देव हा आपला मित्र आहे. तो आपला खेळगडी आहे. विश्वांतील खेळाचा आपला भिड्ू आहे जोडीदार आहे, अशी भावना भक्ताची असते. त्याला देवाची भीति वाटत नाहीं कीं देवाशी मोकळेपणानें बोलण्यास तो संकोचत नाहीं. देवाशीं खेळीमेळीनें तो वागत असतो. माधवराव देशपांडे उर्फ शामाची अशा प्रकारची भक्ति होती. चवथी पायरी वात्सल्य भावाची भक्ति होय. माता पिता ज्या भावनेनें ज्या वात्सल्यानें भक्त देवाकडे पहात असतो. मातापित्यांना आपल्या मुलाची भीति वाटत नाहीं तशी भक्ताला देवाची भीति वाटत नाहीं. भक्तीमधील भीतिचें वातावरण नाहींसें करायला वात्सल्य भाव अत्यंत उपयोगी असल्यामुळें या भक्तीचें विशेष महत्त्व आहे. मातापिता जाणत असतात कीं आपण मुलांना द्यावयाचें असतें. त्यांच्यापासून घ्यावयाचें नसतें. वात्सल्य भावांत या गोष्टी समाविष्ट असल्यामुळें या भक्तींत भक्त देवाला घाबरत नाहीं कीं भीत नाहीं व त्याकडे कधीं कांहीं मागत नाहीं, उलट जवळ असेल नसेल ते देवाला देऊन टाकतो. त्यागाची भावांत या भरांत बलवत्तर असते. आई जितक्या ममताळूपणें व निःस्वार्थीपणें मुलाचें लाड पुरवून त्याची हरएक प्रकारें सेवा करते तशी सेवा वात्सल्य भावामुळें भक्त करीत असतो. साईचरित्रांतील बायजाबाई व

लक्ष्मीबाई यांची अशा प्रकारची भक्ति होती. आपल्या देवाला खाऊं, पिऊं घालण्यांत त्यांच्या मनाला आनंद वाटे. त्यासाठीं पडलेल्या कष्टांची त्यांना फिकीर नसे. सर्वांत श्रेष्ठ म्हणजे मधूर भक्ति होय. हा भाव म्हणजे सर्वांत पराकोटीचा शुद्ध पवित्र व सात्विक प्रेमभाव आहे. राधेची कृष्णाबद्दल अशा प्रकारची भक्ति होती. यामुळें कृष्णाबरोबर तीही चिरंजीव झाली. या कोटींतील भक्त क्वचितच दृष्टीस पडतात. सगुण भक्तीस अत्यंत जरूर असलेले हे पाच भाव वाढीस लावण्यासाठीं संसार अत्यंत उपयोगी येतो.

**आपलें संसारांतील व्यवहार**

आपण संसारांत हरतऱ्हेचें व्यवहार रोज करीत असतों, व्यवहार करतांना त्या त्या व्यवहारास अनुरुप अशा भावना आपल्या ठिकाणीं होत असतात. स्वतःच्या मुलांबाळांत जेव्हां आपण असतो, त्यांच्याशीं हंसत बोलत असतों, त्यांच्या पालन पोषणासंबंधीं व्यवहार वा विचार करीत असतो तेव्हां आपल्या ठिकाणीं प्रामुख्यानें वात्सल्यभाव कार्य करीत असतों व या सर्व व्यवहारामुळें त्याची वाढ होण्यास मदत होते.आपल्या तान्हुल्याचें कोडकौतुक करण्यांत गुंग झालेल्या मातेकडे पाहिल्यास हा भाव संसारांत कसा प्रगट होतो हें कळून येईल. ऑफिसांत गेली कीं आपल्या ठायीं दास्य भावना प्रबळ असते. धनी व चाकर हें नाते लक्षांत घेऊनच आपण वागत असतो म्हणजेच आपल्या पायरीनें राहण्यांची आपण सतत कोशीस करीत असतो. मित्रांत मिसळतो तेव्हां सख्या भावाचा पगडा आपल्यावर असतो. खेळीमेळीनें मोकळेपणानें, अरेतुरेच्या भाषेत आपण त्यावेळीं वागत असतो. बाजारांत जातो त्यावेळीं शांत भाव काम करीत असतो. चांगला माल मिळाला, चार पैशाची बचत झाली म्हणजे आपणाला पूर्ण समाधान वाटते. या गोष्टी ज्याच्या दुकानी पदरीं पडतील तो दुकानदार चांगला. त्यासाठीं तो हवासा वाटतो एवढेंच. बाकी दुकानदाराबद्दल ना सुख ना दुःख. खरेदीचा व्यवहार झाला संपले सगळे. मग तो दुकानदार चार महिने भेटला नाहीं. पण तोच आपला मुलगा चार दिवस भेटला नाहीं तर काळजी वाटते, बाहेरून यायला त्याला, एक तास उशीर झाला तर तळमळ होतें. जीवलग मित्र ८-१५ दिवस दिसला नाहीं तर केव्हां पाहीन असें होते. सोन्याच्या संसारांत मधूर भावाचें प्रगटीकरण होत असतें. शुद्ध, सात्विक व निःस्वार्थी अशा पराकोटीच्या प्रेमाची कल्पना पूर्ण एकात्मतता पतिपत्निंना येऊं शकेल.

**पांच भावांची वाढ**

अशा प्रकारें या पांचही भावांची वाढ संसार करतांना नैसर्गिक रित्या आपोआप होत असतेच. मग आपण त्यांना मुद्दाम व्यवस्थित रीतीने व वळण लावून वाढविले तर ते आपल्याला अध्यात्मांत व भक्तींत किती उपयोग पडतील हें सांगणें नको. हा लाभ उठविण्यासाठींच संसार करावयाचा असतो. या पांच भावाविरहीत

संसार म्हणजे साहरा वाळवंट होय. या वाळवंटातच भांडणतंटे आत्महत्या यांचे अमाप पिक येतें या पांचही भावांची उत्तम मशागत करणें हें सुखी संसार निर्माण करण्याचें साधन आहे. रानोवानीं नैसर्गिकरित्या वाढणाऱ्या आंब्यांना खतपाणी व कलम करूनच ना माणसानें हापूस पायरी सारखे सुंदर व मधुर व रसाळ आंबे पैदा केलें ? तसेंच संसारांत इतस्ततः वावरणाऱ्या या भावनांना खतपाणी घालून त्यांची जोपासना केल्यानें भक्तीची रसाळ फळें आपण पैदा करूं शकूं. या कामी आपण संसार राबवावा. पाचही भावांचे शिक्षण संसारांत मिळतें. संसारांतच हें सर्व भाव अंगवळणीं पडतात. संयमाचे घडे संसारांत जेवढे चांगल्या रीतीनें गिरवितां येतील तेवढे रानावनांत गेल्यानें होणार नाहीं. दया, क्षमा, शांति, यांचा जितका उपयोग करावा तितकें त्यांचें तेज व सामर्थ्य वाढते. असा उपयोग करण्याचे उत्कृष्ट ठिकाण म्हणजे संसार होय. कारण व्यवहार यशस्वी होण्यासाठीं या गोष्टींची जरूरी लागते. समाजांत वावरतांना ही पथ्यें पाळावी लागतातच. अशा प्रकारें अध्यात्मांत काय किंवा भक्तींत काय जरूर असणारे भाव गुण, सदाचार वगैरे गोष्टी शिकण्यासाठीं, त्या आपल्या अंगवळणीं पाडण्यासाठी त्या आपल्या रोमारोमांत भिनण्यासाठीं संसार अत्यंत उपयोगी पडतो. पुस्तकीं ज्ञानकृतींत कसें आणावें यासाठीं जशा शाळा practising school असतात तसा संसार आहे. वेद वा उपनिषदांतील ज्ञान प्रत्यक्ष कृतींत कसें आणावें हें शिकण्याची शाळा म्हणजे संसार. अध्यात्मांतील practising school म्हणजे हा संसार. या दृष्टीनें संसाराकडे पाहिल्यास व तसा त्याचा उपयोग केल्यास दुःखाची काबाडकष्टाची तीव्रता आपणांस कमी भासेल. संसार पदरीं पडलाच आहे. तो कांहीं सुटणार नाहीं. मग रडत बसण्यापेक्षां त्याचा जास्तींत जास्त चांगला उपयोग करून घेणें शहाणपणाचें नाहीं काय ? पदरीं पडलें पावन झालें असें मानून संसाराचा अध्यात्मासाठीं होईल तेवढा उपयोग करुन घेतल्यानें एका दगडांत दोन पक्षी मारल्याचें श्रेय पदरीं पडले. एकतर दुःखाची तीव्रता कमी होऊन संचित क्रियमान घटत राहील व दुसरें म्हणजे आपली अध्यात्मिक प्रगति हळू हळू होत राहील. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे 'आपल्या भावना योग्य ध्येयाकडे वळविल्या नाहींत तर क्षुद्राकडे धांव घेतात म्हणून आपण आपले सर्व विकार प्रेम परमेश्वराकडे वळविलें पाहिजेत. तोच ध्रुव तारा. त्याच्याकडे नजर राहून आपण आपली संसार नौका हांकली पाहिजे." हें सर्व साधण्यासाठीं संसारांत कसें वागावें यासंबंधीं बाबांनीं जें सांगितलें आहे त्याचा विचार पुढील लेखांकांतून करूं.

---

# युगानुयुग चाललेले अहिंसेचे प्रयोग

—संत विनोबा

ज्याप्रमाणें गीतेच्या पहिल्या अध्यायांत एकीकडे कौरव व दुसरीकडे पांडव समोरासमोर उभे केले आहेत, त्याप्रमाणें सद्‌गुणांची दैवी सेना व दुर्गुणांची आसुरी सेना येथें समोरासमोर उभ्या केल्या आहेत: फार प्राचीन काळापासून मानवी मनांत सदसत्प्रवृत्तीचा जो झगडा चालत असतो त्याचे रूपकात्मक वर्णन करण्याची पद्धति पडलेली आहे. वेदांत इंद्र व वृत्र, पुराणांत देव व दानव, तसेंच राम व रावण, पारशांच्या धर्मग्रंथात अहुरमझ्द आणि अहरिमान, खिस्ती धर्मांत प्रभु व सैतान, मुसलमानी धर्मांत परमेश्वर व इब्लीस; अशा प्रकारचे झगडे सर्व धर्मांतून आहेत. काव्यामध्यें स्थूल व ढोबळ विषयाचें वर्णन सूक्ष्म वस्तूंच्या रूपकानें करतात, तर धर्मग्रंथांत सूक्ष्म मनोभावांना ठसठशीत स्थूल रूप देऊन वर्णितात. काव्यांत स्थूलाचें सूक्ष्मानें वर्णन, तर येथें सूक्ष्माचें स्थूलानें वर्णन केलें जातें. यावरून असें सुचवावयाचें नाहीं कीं, गीतेच्या आरंभीं जें युद्धाचें वर्णन आहे तें केवळ काल्पनिक आहे, ती ऐतिहासिक घटनाहि असेल, परंतु कवि त्या घटनेचा स्वतःच्या इष्ट हेतूसाठीं उपयोग करून घेत आहे. कर्तव्यासंबंधीं मोह पडला असतां कसें वागावें, ही गोष्ट युद्धाचें रूपक देऊन मांडली आहे. या सोळाव्या अध्यायांत चांगल्याचा व वाइटाचा झगडा दाखविला आहे. गीतेमध्यें युद्धाचें रूपकहि आहे.

कुरुक्षेत्र बाहेरहि आहे व आपल्या मनांतहि आहे. सूक्ष्म रीतीनें पाहिलें तर जो झगडा मनांत असतो तोच बाहेर आपणांस मूर्तिमंत दिसत असतो. बाहेर शत्रु उभा आहे, तो माझ्याच मनांतील विकार साकार होऊन उभा आहे. आरशांत ज्याप्रमाणें माझेंच बरें वाईट प्रतिबिंब दिसेल, त्याप्रमाणें माझ्या मनांतील बरे वाईट विचार बाहेर शत्रुमित्ररूपानें मला दिसतात. मी जागृतींतील स्वप्नांत पाहतों, त्याप्रमाणें मनांतील बाहेर पाहतों. आंतील युद्ध व बाहेरील युद्ध यांत मुळींच फरक नाहीं. जें खरें युद्ध आहे तें आंतच आहे.

आपल्या अंतःकरणांत एका बाजूस सद्‌गुण तर दुसऱ्या बाजूस दुर्गुण उभे आहेत. त्यांनीं आपली रचना नीट केली आहे. सैन्यांत ज्याप्रमाणें सेनापति लागतो, त्याप्रमाणें येथेंहि सद्‌गुणांनीं एक सेनापति नेमला आहे. या सेनापतीचें नांव—'अभय.' या अध्यायांत अभयाला पहिलें स्थान दिलेलें आहे. ही गोष्ट सहजासहजी झालेली नाहीं. हेतुपुरस्सरच अभय शब्द प्रथम योजिला असावा. कोणत्याहि गुणाची अभया-

शिवाय वाढ नाहीं. खरेपणाशिवाय सद्गुणाला किंमत नाहीं. खरेपणाला निर्भयता लागते. भयभीत वातावरणांत सद्गुणहि दुर्गुण होतील, सत्प्रवृत्तिहि दुबळ्या होतील. निर्भयता सर्व सद्गुणांचा मुख्य नायक आहे. पण सैन्याला आघाडी व पिछाडी दोन्हीकडून पहावें लागतें. सरळ हल्ला समोरून येतो, परंतु पाठीमागून चोरटा हल्ला येण्याचाहि संभव असतो. सद्गुणांच्या आघाडीस "निर्भयता" ठाण मांडून उभी आहे, तर पिछाडी "नम्रता" सांभाळीत आहे. अशी ही मोठी सुंदर रचना केली आहे. एकंदर सव्वीस गुण येथें दिले आहेत. यांतील पंचवीस गुण अंगीं ठसले, व जर का त्याचा अहंकार जडला तर एकदम पाठीमागून हल्ला होऊन मिळवलेलें सारें जावयाचें. म्हणून पाठीमागचे बाजूस 'नम्रता' हा सद्गुण ठेवला आहे. जर नम्रता नसेल तर जयाचें पराजयांत केव्हां रूपांतर होईल तें कळणारहि नाहीं. अशा रीतीनें पुढें "निर्भयता" व मागें "नम्रता" ठेवून सर्व सद्गुणांचा विकास करून घेणें शक्य होईल. या दोन गुणांच्या मध्यें जे चोवीस गुण आहेत, ते बहुतेक अहिंसेचेच पर्याय आहेत असें म्हटलें तरी चालेल. भूतदया, मार्दव, क्षमा, शांति, अवरोध, अहिंसा, अद्रोह, हे निरनिराळे अहिंसेचेच पर्याय-शब्द आहेत. अहिंसा व सत्य या दोन गुणांत सारे येऊन जातात. सर्व सद्गुणांना संक्षेप दिला. तर शेवटीं अहिंसा व सत्य या दोनच वस्तु राहतील. ह्यांच्या पोटांत बाकी सारे सद्गुण येतात. परंतु निर्भयता व नम्रता यांची गोष्ट वेगळी आहे. निर्भयतेनें प्रगति करून घेतां येते व नम्रतेनें बचाव होतो. सत्य व अहिंसा या दोन गुणांचें भांडवल घेऊन निर्भयपणें पुढें गेलें पाहिजे. जीवन विशाल आहे. त्यांत अनिरुद्ध संचार करीत गेलें पाहिजे. पाऊल चुकूं नये म्हणून नम्रता बरोबर असली म्हणजे झालें. मग चला सत्यअहिंसेचे सर्वत्र प्रयोग करीत निर्भयपणें पुढें ! तात्पर्य, सत्य व अहिंसा यांचा विकास निर्भयता व नम्रता यांनीं होतो.

एका बाजूनें सद्गुणांची फौज उभी आहे, तशी इकडे दुर्गुणांचीहि उभी आहे. दंभ, अज्ञान वगैरे दुर्गुणांबद्दल फार बोलावयास नको. या गोष्टी आपल्या परिचयाच्या आहेत. दंभ तर अंगवळणी पडल्यासारखा आहे. सर्व जीवन दंभावर उभारल्यासारखें झालें आहे. अज्ञानासंबंधी बोलायचें म्हणजे अज्ञान ही एक गोजिरवाणी सबब आपण पदोपदीं पुढे मांडीत असतो. जणू अज्ञान म्हणजे फारसा मोठा गुन्हाच नाहीं. परंतु भगवान् सांगतात, "अज्ञान हें पाप आहे." सॉक्रेटीस याच्या उलट म्हणाला होता. खटल्याच्या वेळीं तो म्हणाला, ज्याला तुम्ही पाप समजतां तें अज्ञान आहे व अज्ञान क्षम्य आहे. अज्ञानाशिवाय पाप कसें संभवेल व अज्ञानाला शिक्षा कशी देणार ?" परंतु भगवान् सांगतात, "अज्ञान हें हि पापच आहे." कायद्याचें अज्ञान ही कांहीं बचावाची गोष्ट होऊं शकत नाहीं, असें कायद्यामध्यें सांगतात. ईश्वराच्या कायद्याचें अज्ञानहि फार मोठा गुन्हा आहे.

भगवंतांचें सांगणें व सॉक्रेटिसाचें सांगणें यांतील भावार्थ एकच आहे. स्वतःच्या अज्ञानाकडे कोणत्या दृष्टीनें पहावें हें भगवान् सांगत आहेत, तर दुसऱ्याच्या पापाकडे कोणत्या दृष्टीनें पहावें हें सॉक्रेटीस सांगत आहे. दुसऱ्याच्या पापाबद्दल क्षमा करावी. परंतु स्वतःच्या अज्ञानाचीहि क्षमा करणें पाप आहे. स्वतःचें अज्ञान शिल्लक नाहींच ठेवतां कामा.

अशा रीतीनें एकीकडे दैवी संपत्ति व दुसरीकडे आसुरी संपत्ति, अशा दोन सेना उभ्या आहेत. त्यांतील आसुरी संपत्ति टाळावी व दैवी संपत्ति कवटाळावी. सत्य, अहिंसा इत्यादि दैवी गुणांचा विकास अनादिकालापासून होत आहे. मध्यंतरी जो काळ गेला त्या काळांतहि पुष्कळ अवसर आहे. विकासाची मर्यादा संपली असें नाहीं. जोंपर्यंत सामाजिक शरीर आपणांस आहे, तोंपर्यंत विकासास अनंत अवकाश आहे. वैयक्तिक विकास झाला तरी सामाजिक, राष्ट्रीय जागतिक, विकास राहतोच व्यक्तीनें आपल्या विकासाचे खत घालून मग जमाव व राष्ट्र यांतील लाखों व्यक्तींच्या विकासास सुरवात करावयाची असतें. उदाहरणार्थ, मानवाने अहिंसेचा विकास अनादि काळापासून चालविला असला तर आजहि तो विकास सुरूच आहे.

अहिंसेचा विकास होत गेला ते पाहण्यासारखें आहे. त्यावरून पारमार्थिक जीवनाचा विकास उत्तरोत्तर कसा होत आहे व त्याला अजून पूर्ण अवकाश कसा आहे हें दिसून येईल. हिंसकांच्या हल्ल्यापासून बचाव कसा करावा याचा अहिंसक माणूस विचार करूं लागला. आधीं समाज रक्षणार्थ क्षत्रियवर्ग ठेवला परंतु तोच पुढें समाजभक्षण करूं लागला. तेव्हां या उन्मत्त क्षत्रियांपासून बचाव कसा करावा याचा अहिंसक ब्राम्हण विचार करू लागले. परशुरामानें स्वतः अहिंसक असूनहि हिंसेचा अवलंब केला व तो क्षत्रियांचा निःपात करूं लागला. क्षत्रियांनीं हिंसा सोडावी म्हणून तो स्वतः हिंसक बनला. हा अहिंसेचाच प्रयोग होता; परंतु तो यशस्वी झाला नाहीं. एकवीस वेळां क्षत्रियांचा संहार करूनहि ते उरलेच. कारण हा प्रयोग मुळांतच चुकीचा होता. ज्या क्षत्रियांत त्यांचा नायनाट करण्यासाठीं म्हणून मीं भर घातली तो क्षत्रिय-वर्ग कसा नष्ट व्हावा? मी स्वतःच हिंसक क्षत्रिय बनलों. हें बीज कायमच राहिलें. बीज कायम ठेवून झाडें तोडणारास पुन्हां पुन्हां झाडें उत्पन्न झालेली दिसणारच. परशुराम मला माणूस होता. परंतु प्रयोग मोठा विचित्र झाला. स्वतः क्षत्रिय होऊन तो पृथ्वी निःक्षत्रिय करूं पाहत होता. वास्तविक स्वतःपासूनच त्यानें प्रयोग सुरू केला पाहिजे होता. स्वतःचेच डोकें त्यानें प्रथम उडविलें पाहिजे होतें. परशुरामाचा मी दोष दाखवितों, तो त्याच्यापेक्षां मी शाहणा म्हणून नव्हे. मी बालक आहे. पण त्याच्या खांद्यावर उभा आहे. म्हणून मला साहजिकच जास्त दिसत आहे. परशुरामाच्या प्रयोगाचा आधारच चुकीचा

होता. हिंसामय होऊन हिंसेला दूर करणें शक्य नाहीं. उलट त्यामुळें हिंसकांची संख्या मात्र वाढते. परंतु त्या वेळेस ही गोष्ट लक्षांत आली नाहीं. त्या वेळच्या भल्या माणसांनीं, थोर अहिंसामय माणसांनीं, विचार सुचला त्याप्रमाणें प्रयोग केले. परशुराम हा त्या वेळचा थोर अहिंसावादी. हिंसेच्या उद्देशानें हिंसा केली नाहीं, अहिंसा स्थापण्यासाठीं ती हिंसा होती.

तो प्रयोग फसला: पुढें रामाचें युग आलें. त्या वेळेस पुन्हां ब्राह्मणांनीं विचार सुरु केला. त्यांनीं हिंसा सोडली होती. स्वतः हिंसा नाहींच करावयाची असें त्यांनीं ठरविलें. परंतु राक्षसांचे हल्ले कसे परतवावयाचे ? त्यांनीं असें पाहिलें कीं क्षत्रिय हिंसा करणारे आहेत च त्यांच्याकडून परभारें राक्षसांचा संहार करवावा. कांट्यानें कांटा काढावा. आपण स्वतः नामानिराळें रहावें. विश्वामित्रानें यज्ञरक्षणार्थ रामलक्ष्मणास बोलावून त्यांच्या करवीं राक्षस संहारिले. “जी अहिंसा स्वसंरक्षित नाहीं, ज्या अहिंसेला स्वतःचे पाय नाहींत असली लुळीपांगळी अहिंसा उभी कशी रहावयाची ?” असा विचार आज आपण करतो; परंतु वशिष्ठ-विश्वामित्रासारख्यांस क्षत्रियांच्या बळावर स्वतःचा बचाव करुन घेण्यांत कमीपणा वाटला नाहीं. परंतु रामासारखा क्षत्रिय न भेटता तर ? विश्वामित्र म्हणता, “मी मरेन, परंतु हिंसा करणार नाहीं.” हिंसक होऊन हिंसा दूर करण्याचा प्रयोग होऊन गेला होता. आतां स्वताची अहिंसा तर नाहींच सोडावयाची हें ठरून गेले होते, क्षत्रिय न लाभला तर अहिंसक मरून जातील अशी आतां भूमिका होती. अरण्यकांडांत एक प्रसंग आहे. रामानें विचारलें, ‘हे ढीग कसले ?” ऋषि म्हणाले, “हे ब्राह्मणांच्या हाडांचे ढीग आहेत, अहिंसक ब्राह्मणांनीं हल्ला करणाऱ्या हिंसक राक्षसांचा प्रतिकार केला नाहीं. ते मेले. त्याच्या हाडांचे हे ढीग.” ब्राह्मणांच्या या अहिंसेंत त्याग होता. परंतु दुसऱ्यापासून संरक्षणाची अपेक्षा होती असल्या दुबळेपणानें अहिंसेची पूर्णता होत नाहीं.

संतांनीं पुढें तिसरा प्रयोग केला. संतांनीं असें ठरविलें, “दुसऱ्याची मदत मागावयाचीच नाहीं. माझी अहिंसाच माझा बचाव करील. असा जो बचाव होईल तोच खरा.” संतांचा हा प्रयोग व्यक्ति-निष्ट होता. हा व्यक्तिगत प्रयोग त्यांनीं पूर्णत्वास नेला. परंतु प्रयोगांत व्यक्तिगतता राहिली. समाजावर हिंसकांचा हल्ला आला असतां जर तो समाज संतांकडे येऊन विचारता, “आम्हीं काय करावें ?” तर त्या प्रश्नाला संतांना निश्चित उत्तर कदाचित् देतां आलें नसतें. व्यक्तिगत जीवनांत परिपूर्ण अहिंसा असणारे संत समाजाला सल्ला देतांना म्हणाले असते, “आम्ही दुबळे आहोंत.” संतांना मी दोष देतों हें बाल साहस आहे. मी त्यांच्या खांद्यावर आहे म्हणून जें दिसतें तें सांगतों. त्यांनीं मला क्षमा करावी. ते करतीलच. कारण त्यांची क्षमा थोर आहे. अहिंसेच्या साधनानें सामुदायिक प्रयोग करावे असें संतांस वाटत नसेल असें नाहीं. पण त्यांना परिस्थिति तितकी अनुकूल वाटली नाहीं. त्यांनीं स्वतः पुरते

अलग अलग प्रयोग केले. परंतु अलग अलग केलेल्या प्रयोगांतूनच शास्त्र रचलें जातें. संमीलित अनुभवांतून शास्त्र बनतें.

संतांच्या प्रयोगानंतरचा चौथा प्रयोग आज आपण करीत आहोंत. सर्व समाजानें अहिंसात्मक साधनांनीं हिंसेचा प्रतिकार करण्याचा आजचा प्रयोग आपण चालविला आहे. अशा प्रकारें चार प्रयोग आपण पाहिले. प्रत्येक प्रयोगांत अपूर्णता होती आणि आहे. विकासक्रमांत ही गोष्ट अपरिहार्यच आहे. परंतु त्या त्या काळांत ते ते प्रयोग पूर्णच होते असें म्हटलें पाहिजे. आणखी दहा हजार वर्षांनीं आजच्या आपल्या अहिंसक युद्धांतहि पुष्कळ हिंसा दिसून येईल. शुद्ध अहिंसेचे प्रयोग आणखी होत जातील ज्ञान कर्म व भक्ति यांचाच नव्हे तर सर्व सद्‌गुणांचा विकास होऊन राहिला आहे. एक वस्तु पूर्ण आहे. ती म्हणजे परमात्मा. भगवद्‌गीतेंतील पुरुषोत्तमयोग पूर्ण आहे. परंतु व्यक्ति आणि समुदाय यांच्या जीवनांत त्याचा पूर्ण विकास व्हावयाचा आहे वचनांचाहि विकास होतो. ऋषि मंत्राचे द्रष्टे समजले जात, कर्ते नव्हेत. कारण त्यांना एक दर्शन झालें. यापुढें आपणांस त्याचा विकसित अर्थ असूं शकतो. त्यांच्यापेक्षां आपणांस जास्त दिसतें हा कांहीं आपला त्याचा विकसित अर्थ शकतो. त्यांच्यापेक्षा आपणांस त्याचा विकसित अर्थ दिसूं शकतो. त्यांच्यापेक्षां आपणास जास्त दिसतें हा कांहीं आपला विशेष नव्हे. त्यांच्याच आधारावर आपण पुढें जातों. मी येथें अहिंसेच्याच विकासावर बोलत आहे, याचें कारण सर्व सद्‌गुणांचें सरासरीनें सार काढलें तर अहिंसा हेंच निघेल, आणि त्या युद्धांत आपण आज पडलोंहि आहोंत. म्हणून या तत्वाचा कसा विकास होत आहे तें पाहिलें.

हिंसकांचा हल्ला आला असतां अहिंसकांनीं बचाव कसा करावा ही अहिं- एक बाजू आपण पाहिली, माणसा-माणसांतील झगड्यांत आहे बकरी राहूनच तिने विकास करून घेतला पाहिजे. बकरी जर ' मी गाय होईन ' असें म्हणेल तर तें शक्य नाहीं. स्वयंप्राप्त बकरीपणाचा त्याग तिला करतां येत नाहीं. त्यासाठीं तिला शरीर सोडावे लागेल. नवीन धर्म, नवीन जन्म, घ्यावा लागेल. परंतु या जन्मी तो बकरीपणा, तोच पवित्र आहे. बैल व बेडकीची गोष्ट आहे ना ? बेडकीच्या वाढीला मर्यादा आहे ती बैलासारखी होऊ पाहिलं तर मरेल. दुसऱ्या रूपाची नक्कल करणें योग्य होत नाहीं म्हणून परधर्म भयावह म्हटला आहे.

पुन्हां स्वधर्मात हि दोन भाग आहेत. एक बदलणारा भाग व दुसरा न बदलणारा. आजचा मी उद्यां नाहीं, उद्यांचा परवां नाहीं. मी सारखा बदलत आहे. लहान मूल असतांनाचा स्वधर्म म्हणजे केवळ संवर्धन तरुणपणांत माझ्या ठिकाणीं कर्म-शक्ती भरपूर असेल तर तद्द्वारा समाजसेवा मी करीन. प्रौढ-पणांत माझ्या ज्ञानाचा इतरास लाभ मिळेल. असा कांहीं स्वधर्म बदलणारा आहे, तर दुसरा कांहीं न बदलणारा आहे. यांनाच पूर्वीच्या शास्त्रीय संज्ञा द्याव

याच्या झाल्या तर आपण असें म्हणून "मनुष्याला वर्ण धर्म आहे व आश्रम धर्म आहे. वर्णधर्म बदलत नाहीं. आश्रमधर्म बदलतात."

आश्रमधर्म बदलतात म्हणजे मी ब्रह्मचारिपद सार्थक करुन गृहस्थ होतों, गृहस्थाचा वानप्रस्थ होतों, वानप्रस्थाचा सन्यासी होतों. आश्रमधर्म असा बदलत असला तरी वर्णधर्म बदलतां येत नाहीं. माझी नैसर्गिक मर्यादा मला सोडतां येणार नाहीं. यो प्रयत्न मिथ्या आहे. तुमच्यांतील तुम्हीपणा तुम्हांला टाळतां येणार नाहीं, या कल्पनेवर वर्णधर्मांची योजना आहे, वर्णधर्मांची कल्पना गोड आहे. वर्णधर्म अगदींच अटळ आहे का ? बकरीचें जसें बकरीपण, गाईचें गायपण, तसें ब्राह्मणांचें ब्राह्मणतत्व, क्षत्रियांचे क्षत्रियत्व, आहे का ? वर्णधर्म इतका पक्का नाहीं ही गोष्ट मी मान्य करतों; परंतु ही गोष्ट स्वारस्यानें घ्यावयाची. वर्णधर्म सामजिक व्यवस्थेसाठीं युक्ति म्हणून जेव्हां वापरला जातो, तेव्हां त्यांत अपवाद येणारच. तो अपवाद गृहीत धरावाच लागतो. तो अपवाद गीतनें गृहीत धरला आहे. सारांश, हे दोन प्रकारचे धर्म ओळखून आवान्तर धर्म मनमोहक दिसले तरी ते टाळा.

फलत्यागाच्या कल्पनेचा जो आपण विकास करीत आलों, त्यांतून पुढील अर्थ निघालाः—

१. राजस व तामस कर्मांचा सर्वस्वीं त्याग.

२. त्या त्यागाचाहि फलत्याग. त्याचाहि अहंकार नको.

३. सात्विक कर्मांचा स्वरूपतः त्याग न करतां फक्त फलत्याग.

४. सात्विक कर्में जीं फलत्यागपूर्वक करावयाचीं तीं सदोष असलीं तरी करावयाचीं.

५. सतत फलत्यागपूर्वक तीं सात्विक कर्में करीत करीत चित्त शुद्ध होईल व तीव्राचें सौम्य, सौम्याचें सूक्ष्म व सूक्ष्माचें शून्य, अशा रीतीनें सारें क्रियाजात गळून पडेल.

६. क्रिया गळून पडतील, परंतु कर्म लोकसंग्रहरूप कर्म होतच राहील.

७. सात्विक कर्महि जें ओघप्राप्त तेंच करावयाचे. जें ओघप्राप्त नाहीं, तें किती हि चांगला वाटलें तरी दूर राखावयाचे. त्याचा मोह नको.

८. सहज प्राप्त स्वधर्महि पुन्हां दोन प्रकारचा. बदलणारा व न बदलणारा. वर्णधर्म बदलत नाहीं. अश्रमधर्म बदलतो. बदलणारा स्वधर्म बदलत राहीला पाहिजे. त्यामुळें प्रकृति विशुद्ध राहील.

—संत विनोबा

———

# दिवाळीचा शुभ संदेश

दिवाळी हा मोठा दैवी उत्सव आहे. हिंदूंचा तर तो सर्वांत मोठा सण आहे. ज्याच्या ठिकाणीं आपलें आर्यत्व, आपला धर्म आणि आपले पूर्वज, ऋषि यांच्या संबधांची स्मृति जागृत आहे, अशा कोणाही हिंदूच्या मनांत दिवाळीविषयीं विचार येतांच त्यामध्यें त्याला स्वतःस बोधकारण, व स्फूर्तिकारक, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे, स्वतःचा आयुःक्रम शुद्ध व दैविकसंपत्तियुक्त करण्याची महत्त्वाकांक्षा अंतःकरणांत जागृत करणाऱ्या अशाःबऱ्याच गोष्टी आढळून आल्याशिवाय राहाणार नाहींत. रोषणाईचा लखलखाट करून आणि मिष्टमिष्ट पदार्थ सेवन करून आबालवृद्ध दिवाळीचा सण साजरा कारतात; परंतु दिवाळीच्या दिवसांत हिंदु लोकांच्या घरोघरीं होणाऱ्या दीपोत्सवापासून आणि मिष्ट पदार्थ सेवनापासून जो हा आनंदी आनंद होत असतो, तो हृदयांतर्गत प्रेमाचें, गृहसौख्याच्या माधुरीचें, कुटुंबांत नांदणाऱ्या ऐक्याचें, स्नेहभावयुक्त आगत स्वागताचें बाह्य चिन्हच होय. हीं सुखें उत्पन्न व्हावीं, असलेल्याचें नवीकरण व्हावें, हाच प्राचीन काळपासून दिवाळीच्या उत्सवाचा हेतु आहे. 'दिवाळी' म्हटल्याबरोबर शांति व धर्मनिष्ठा हीं सूचित झालीं पाहिजेत. दिपवाळीच्या महोत्सवामध्यें इंद्रियविषयक अशा सुखांशिवाय दुसरींहि सुखें आहेत. तीं ज्याला दिसत नाहींत व उपभोगितां येत नाहींत, तो हिंदु असला तरी नांवाचाच हिंदु म्हटला पाहिजे. खऱ्या हिंदूचें अंतःकरण इतकें दुर्बल उच्च सुखस्वाद घेणाऱ्यास असमर्थ असें कधींहि नसतें.

आपल्या पूज्य ऋषींनीं व्यावहारिक ज्ञानदृष्टीनें मनुष्याच्या आयुष्याचे चार विभाग यथाक्रम केलेले आहेत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यास हे ते चार विभाग होत. ब्रह्मचारी व वानप्रस्थ या दोन आश्रमांचेंच हिंदुधर्मांत व वेदान्तपर ग्रंथांत जास्त महत्त्व मानिलें आहे; व तोच आयुष्यक्रम सर्वांत श्रेष्ठ, असें त्यांत सांगितलेलें आहे; अशी कित्येकांची समजूत आहे, परंतु ती चुकी होय. ऋषी हे त्याकाळचे सर्वांत ज्ञानसंपन्न पुरुष होते. त्यांना गृहस्थाश्रमाचें महत्त्व कळून चुकलें होतें. कुटुंब म्हणजे समाजाचा पाया आहे; आणि नुसते जीवितास उदात्तता प्राप्त करून देणारेच नव्हे, तर लोकसमुदायास श्रेष्ठत्व प्राप्त करून देण्याच्या कार्मी साहाय्यभूत होणारे सद्गुण गृहस्थाश्रमांतील कर्तव्यक्षेत्रांत वावरूनच संपादितां येतात, हे ऋषींना पूर्णपणें अवगत होतें. सन्मार्गानें अर्थार्जन करणारा, सम्यक्–ज्ञानानें संपन्न अतिथिप्रिय, श्राद्धादी विधि करणारा आणि सत्यवादी असा गृहस्थाश्रमी मनुष्यहि मोक्षाप्रत जातो, असें **याज्ञवल्क्य** ऋषीनें म्हटलें आहे. विष्णुपुराणांत तर गृहस्थाश्रम हा सर्वांत श्रेष्ठ व उदात्ततम, असा मानिलेला आहे.

गृहामध्येंच प्रेमाचा पहिला धडा आपण शिकतों. प्रेमाचा दीप तेवत नसला तर, जग भयाण, निराशापूर्ण भासेल, आणि जीवित दुःखमय, केवळ भारभूत असें वाटेल. प्रेमप्रकाशाचें उगमस्थान म्हणजे गृहच होय. जें जें कांहीं मनुष्याला चांगुलपणा देणारें आहे, जें राष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून देणारें आहे, आज्ञाधारकता, स्वार्थत्याग, आणि कर्तव्यें मग तीं कितीही क्षुल्लक असोत, तीं निष्ठापूर्वक करण्याची प्रवृत्ति, हे सर्व गुण गृहांमध्येंच आढळतात, आणि ते शिकण्याची उत्कृष्ट जागाहि पण तीच. गृह अर्थात् कुटुंब हें जगाचा एक भाग असून 'पिंड ब्रह्मांड' न्यायानें तें एक लहानसें जगच आहे, असें समजलें जातें. समाजाचे घटक, स्त्रीपुरुष, राज्यांतले नागरिक, कार्यकर्ते माणसें, साधु, वीर आणि विद्वान पुरुष जन्माला येण्याचें स्थान गृहच होय. सारांश, एखाद्या देशांतले बहुतेक कुटुंबांचें विचार भावना, कृत्यें आणि महत्त्वकांक्षा हीं कशा प्रकारचीं आहेत, ते मला सांगा, म्हणजे तो देश कोणत्या दर्जाचा आहे, श्रेष्ठ दर्जाचा आहे, कीं कनिष्ठ दर्जाचा आहे, तें मी सांगेन.

घरामध्येंच आपणास पहिल्याने कर्तव्य करणें भाग पडतें, आणि तें कर्तव्य म्हणजेच प्रेमाचे धडे शिकण्याची शाळा होय. मातापितरें व मुलें, पति व पत्नी, बंधु व भगिनी यांच्यामधलें नातेंच स्वभाविकपणें आयुष्यक्रमांतील पवित्र कर्तव्यें अशीं जीं गृहकृत्यें ती करून आपल्य सर्व माणसांना सुखी करण्यासाठीं आपणास झटावयास लावतें. या दिवाळीच्या सणामध्यें स्नेहीसंबंधी आप्तइष्ट जेव्हां परस्परांना भेटतील, तेव्हां त्यांनीं या सणाचें धार्मिकदृष्ट्या असलेलें महत्त्व लक्षांत ठेवण्यास विसरूं नये. कारण ज्ञान व प्रेम यांच्या उज्ज्वळ प्रकाशांत आयुष्यक्रमण करण्याचा आम्ही प्रयत्न केला पाहिजे, या गोष्टीची आम्हांस आठवण करून देण्यासाठींच या सणाची योजना आहे. कुटुंब हेंच सद्गुणाचें निवासस्थान होय, आणि प्रेमापेक्षां उच्चतर असा कोणताहि सद्गुण नाहीं. 'प्रेम ही एक नियामक शक्ति आहे,' असें एक थोर पुरुष म्हणतो. दुसऱ्या एका मोठ्या सूज्ञ पुरुषाचें असें वचन आहे कीं, "चिरकाल टिकणाऱ्या सर्व प्रकारच्या वैभवाचा आधार प्रेमच होय. प्रेम नष्ट झालें कीं, आमचें जीवित मातीमोल झालेंच म्हणून समजावें!"

प्रेमाला निरनिराळीं माणसें निरनिराळ्या रीतीनें ओळखतात. स्वार्थी विषयसुखांच्या पलीकडे ज्याला कांहीं दिसत नाहीं असा ऐहिक दृष्टीचा मनुष्य त्याला प्रीति म्हणतो; कवि त्याला प्रेम या नांवानें ओळखतो, परंतु प्रेमाचा उगम परमेश्वरापासून आहे, हे जाणून त्या उगमापाशींच ज्यानें प्रेमरसाचें पान केलें आहे, असा भगवद्भक्त त्याला **भक्ति** या नांवानें संबोधितो. एकच वस्तु पण निरनिराळ्या इसम तिला निरनिराळ्या नांवांनीं ओळखतात. कवि आणि साधु हे मात्र तिला तत्त्वतः ओळखतात, '**सर्वे सुखमवाप्नोतु सर्वः सर्वत्र नन्दतु** हेंच प्रेमाचें रहस्य होय. मनूनें धर्माचें विवरण

करतांना देखील असेंच सांगितलें आहे कीं, '**समः सर्वेषु भूतेषु न लिंग धर्मकारणम.**' भगवद्गीतेंतहि म्हटलें आहे कीं,

**आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ॥**
**सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ १ ॥**

आमचें प्रेम, आमची न्यायबुद्धि, आमची सत्यप्रीति आमचा स्वार्थत्याग, आमची कार्यप्रवृत्ति, कर्तव्य म्हणजे एक कटकट नव्हे, तर एक प्रकारची भक्ति आहे, असें मानण्याचा स्वभाव, हीं सर्व शिकण्याचें स्थळ म्हणजे गृहच होय. यांच्या-मुळेंच समाजचक्राला गति मिळत असते. ही नसली, अथवा ह्यांचा र्‍हास होऊं लागला, तर समाज अवनत दिशेस पोंचतो, त्याची जीवनकला नाहींशी होऊं लागते. कुटुंबप्रीतीपासून स्वदेशप्रीतीस सुरवात व्हावी असाच ईश्वरी संकल्प आहे. स्वदेश-प्रीतीचीहि परिणतावस्था आहे व ती अखिल मानवजातीवरील प्रीति ही होय. आमचा देश पतित झाला आहे, याचें कारण आमच्यांतील फाटाफूट हें होय. ही फाटाफूट होण्याचें कारण म्हणजे पंथ, जाति व पोटजाति यांच्यामुळें आमचा समाज सहस्रधा विदीर्ण झाला आहे, हें होय. आमच्या अंतःकरणांतील प्रेमज्योत निर्वाणास गेली. प्रेमज्योतीच्या प्रकाशामध्यें उदार मनानें व शुद्ध अंतःकरणानें सर्व मानवजातीच्या विस्तीर्ण जगांत वावरावयाचें सोडून कूपमंडूकवत् स्वार्थ दृष्टीनें आम्हीं आमच्या पुरतीं लहान लहान जगें निर्माण केलीं; स्वतःच्या व्यक्तीपुरतें अथवा जातीपुरतेंच पाहूं लागलों, हें या सर्व अवनतदशेचें कारण होय. आमच्या अंतःकरणावर तिमिराचें आवरण पडलें आहे. त्या ठिकाणी प्रकाश पडण्याची आवश्यकता आहे. तो प्रकाश दिवाळी आणून देत आहे. तर त्या प्रकाशाचा आम्हीं आमच्या हृदयमंदिरांमध्यें संचार होऊं देऊन तीं दीपावलीप्रमाणें सुप्रकाशित, सुरम्य, सुप्रसन्न, व तेजःसंपन्न करूं या.

दिवाळीच्या संदेशाकडे कान द्या. 'प्रेम' हाच तो संदेश आपल्या अंतःकरणांत आपल्या निवासस्थानांत आणि अंतकरणांत प्रेमाचेंच साम्राज्य होऊं द्या; आपण कलह करण्याचें सोडूं; क्षुद्र भेद विसरूं, आपल्या आकुंचित विचारांस व स्वार्थी कल्पनांस रजा देऊं जग म्हणजे परमेश्वराचें बाह्य स्वरूप आहे, अशा दृष्टीनें आपण त्याच्याकडे पाहूं; म्हणजे प्रत्येक स्त्रीपुरुषाच्या ठिकाणीं बंधुभगिनीभाव आपणांस प्रतीत होईल.

दिवाळीच्या संदेशाचा हा एक भाग झाला. काळ बदलत असतो; जुने प्रघात जातात; नवी परिस्थिति व नवे प्रचारही उत्पन्न होतात. मनुष्य परिस्थित्यनुरूप बनतो असें म्हणचें आहे. त्यानें चळवळ केली पाहिजे, त्यानें वाढलें पाहिजे, ही गति आणि वाढ यांना प्रयत्नांची जरूरी असते. आपण ज्या काळांत व ज्या परिस्थितींत असं

त्या काळाला व त्या परिस्थितीला अनुरूप असेंच आपलें वर्तन पाहिजे. त्या काळीं असलेल्या बौद्धिक, नैतिक, सामाजिक, राजकीय आणि औद्योगिक परिस्थितीप्रमाणें आपण वागलें पाहिजे, भूतकाळाची परंपरा आपणांस तोडतां येणें शक्य नाहीं. त्या परंपरा आपल्या समागमें आहेत व नेहमीं असणारहि; परंतु भूतकाळाविषयीं बोलतांना एक शाश्वत व दुसरा अशाश्वत असे त्याचे दोन विभाग आहेत, हे विसरतां कामा नये. एका काळांत जें योग्य असेल तें दुसऱ्या काळात तसें असेलच असें नाहीं. अशाश्वत तें हेंच. शाश्वत भाग असतो तो सत्य, धर्म्य गोष्टींत ईश्वरावर दृढ श्रद्धा ठेवून सत्कार्यार्थ झटण्यामध्यें असतो. हिंदुधर्मांतील आकुंचित विचारांचा त्याग करून, हिंदुधर्माचे उदारबुद्धिमीमांसक जे साधु त्यांनीं उपदेशिलेल्या उदारतत्त्वांप्रमाणें जो आचरण ठेवितो, तोच खरा हिंदु होय. तोच हिंदुधर्माच्या अंतःस्वरूपाचें रक्षण करतो. इतर नांवाचेच हिंदु होत. कालानुसार प्रगति करावयाला धर्मशास्त्रांची आडकाठी नाहीं. पूर्वी धर्मप्रीत्यर्थ करावयाच्या यज्ञांत पशुवध करणें हें धर्मशास्त्रामध्यें विहित मानलेलें असें; परंतु नंतरच्या काळीं रूढीनें पशुवध निषिद्ध ठरविला. "**अस्वगर्ग्यं लोकविद्विष्टं धर्म्यमप्याचरेन्नतु**" याचा वास्तविक अर्थ हाच कीं, प्रत्येक काळच्या लोकांना आपल्या परिस्थितीस अनुसरून अशा प्रकारचीं नवीन नवीन ध्येयें अस्तित्वांत आणण्याचा, नवीन नवीन रूढी प्रचलित करण्याचा अधिकार आहे. दीपमालांनीं विभूषीत दिवाळीचा सण येतो, तो, तुम्हीं प्रकाशपुत्र व्हा, प्रगतीच्या मार्गास लागा, जुन्या चालींना अंधपणानें चिकटून राहूं नका, मन्वंतराला अनुरूप असें वर्तन ठेवा, असेंच आम्हांस सांगतो.


हाच दिवाळीचा संदेश आहे. या महोत्सवप्रसंगाची योजना हाच अति उदात्त विचार सूचित करण्यासाठीं आहे. पण लक्षांत ठेवा कीं, खरा विचार म्हटला म्हणजे नुसता विचारच नसतो, तर त्याप्रमाणें आचारहि असावा लागतो. अर्जुनानें श्रीकृष्णास विचारलें, 'ज्ञान म्हणजे काय ?' श्रीकृष्णानें सांगितलें कीं, 'अमानित्व अदंभित्व अहिंसा क्षान्ति, व आर्जव (सरळपणा) यांतच ज्ञान समाविष्ट होतें' याचा अर्थ ? काय ? अर्थ एवढाच कीं, विचार व कृति ह्यांचे नेहमी साहचर्य असलें पाहिजे. प्रख्यात् तत्ववेत्ता **मार्टीनो** म्हणतो 'आमचा विचार व आमची कृति यांच्यामध्यें मेळ असावा, अशी ईश्वराची आग्रहपुरःसर इच्छा आहे. कारण एकदां विचार सत्यास धरून असला तरी त्याला अनुसरून वर्तन ठेवणाऱ्या माणसाचा तो क्रम बंद झाला आणि तीच स्थिति कायम राहिली म्हणजे त्या माणसाच्या ठिकाणीं त्या सत्य विचाराला असत्यत्व प्राप्त होतें.' आपल्या विचाराप्रमाणें जें जें कांहीं शुभ व सत्य असेल तें तें आपण कृतींत दाखविलें पाहिजे.

एवंच, दिवाळीचा संदेश म्हणजे ईश्वरीसंदेश आहे, तो संदेश प्रकाशाचा आहे आणि प्रकाश म्हणजे प्रेम होय. नुसत्या जातीपुरतें किंवा विशिष्ट कंपूपुरतें प्रेम नव्हे, तर

सर्व मानवजातीपुरतें प्रेम अंतःकरण उदार करणारें, दृष्टी फांकविणारें आणि सत्य व धर्म्य कार्यार्थं प्रवृत्त करणारें असें हें प्रेम आहे. सुविचारसंमत धोरणानें, दिव्य उत्साहानें, प्रगतिपथ क्रमण करावा असाही या संदेशाचा अर्थ आहे. हा संदेश खऱ्या स्वदेशभक्तीचा आहे. कारण प्रेमानें व प्रगमनेच्छेनें प्रेरिक होण्याचा उपदेश करीत असतां हा संदेश आम्हांला सांगत आहे कीं, तुम्ही स्वदेशभक्त झाला तरी गृहस्थ या नात्यानें प्राप्त असलेले शिष्टाचार पाळण्यास विसरूं नका; विम्मेपणानें योग्य कालाची वाट पहात, विचारानें वागत, अनुकंपा बाळगीत आणि उदात्त व पुण्य अशीं कृत्यें करीत रहा.


## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स्, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितों. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रें यांना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स** ८५ बापू खोटे स्ट्रीट, जांभळी मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर — डी. एच्. साखरकर

# भक्तिमार्गांत वेठ नको

◆◆◆◆◆◆◆◆◆

वेठीस धरल्यासारखा आमचा सारा व्यवहार चाललेला असतो. तुमच्यावर कोणी ओझें का ठेविलें आहे? जें कांहीं कराल, देवाचे नामस्मरण कराल तें अंतःकरणापासून करा. वेठीची भक्ति काय कामाची? तिचें फळ तुम्हांला कसें बरें मिळेल?

तळमळी चित्त दर्शनाची आशा ।
बहु जगदीशा करुणा केली ॥ १ ॥
वचनींस संत पावले स्वरूप ।
माझें नेदी पाप योगा येऊं ॥ २ ॥
वेठीऐसा करीं भक्तिवेवसाव ।
न पावेचि जीव समाधान ॥ ३ ?
तुका म्हणे कई देसील विसांवा ।
देवराया धांवा घेतें मन ॥ ४ ॥

या तुकारामबावांच्या अभंगाचें सार दुसऱ्या व तिसऱ्या चरणांत आहे. ‘हे परमेश्वरा, मागें साधुसंत तुझें नामोच्चारण करून स्वरूपाप्रत पावले, त्वद्रूप झाले; परंतु तसा योग घडण्यास माझें पाप आड येते,’ असें दुसऱ्या चरणांत म्हटलें आहे. ज्याला असे प्रसंग येत नाहींत, आणि परमात्म्याच्या दर्शनास आपलें पाप आडवें येतें, अशी प्रतीति येत नाहीं, तो धर्ममार्गीतला खरा अधिकारीच नव्हे. ऐहिक व्यवहारांत आपण कोणताहि उद्योग केला, आणि त्याचें फल प्राप्त झालें नाहीं, तर देवाला किंवा दैवाला शब्द लावण्याची साधारण प्रवृत्ति असते; आपणाकडे दोष घेण्याची वृत्ती मनाची फार करून नसते. संसाराप्रमाणें परमेश्वरप्राप्तीच्या मार्गास लागलेल्यांचाही प्रकार असाच होत असतो. आपण चुकत आहों म्हणून फलप्राप्ति होत नाहीं, असें मनाला सहसा वाटत नसतें. परमेश्वराच्या दर्शनाविषयीं उत्कंठा असतां भेट तर होण्याचा योग येत नाहीं. अशा विवंचनेंत पडलें असतां, तुकारामबावांनी वरील अभंग केला आहे. आपणांस ज्याविषयीं आज विशेषेंकरून विचार कर्तव्य आहे तो भाग तिसऱ्या चरणांत आहे. तो हा कीं, भक्तिव्यवसाय वेठीच्या दृष्टीनें केला असतां मनाला समाधान व्हावें तसें होत नाहीं. शहरांतील जुन्या

अनुभवाच्या लोकांस व बाहेर गांवीं सांप्रतही, वेठ अथवा बिगार म्हणजे काय हें माहित असतें. गोरगरीबांकडून त्यांस मुळींच मजुरी वगैरे न देतां आपल्या दौलतीच्या अथवा अधिकाराच्या जोरावर काम करून घेणें, याला वेठ म्हणतात. हा श्रीमंत लोकांचा व सरकारी अधिकाऱ्यांचा हक्क असतो. त्यास सुखसाधनें अधिक सुलभ व्हांवी म्हणून गरीब दुबळ्यांकडून त्यांच्या मेहनतीच्या मानानें अत्यंत अल्प बलुत्यावरी जो जुलमाचा रामराम करविला जातो, ती वेठ किंवा बिगार होय. अर्थात नाखुशीनें करावयाचा असा हा वेठीचा व्यवसाय कधींही समाधानकारक व्हायचा नाहीं. ओझें उचललें, काबाडकष्ट केलें, आणि त्याचा मोबदला मिळाला नाहीं, तर करणाराला समाधान तें कसें होणार ?

लोकव्यवहारांत वेठ अनेक प्रकारची होऊं शकते; पण भक्तिव्यवसाय वेठीचा कसा होऊं शकेल, ही शंका सहज उभी राहते. श्रीमंतानें अथवा सत्ताधाऱ्यानें गरीबावर कामगिरी लादणें संभवतें व तसें नेहमीं होतही असतें, पण त्याप्रमाणें परमेश्वराची भक्ति करण्याच्या बाबतींत होणें शक्य आहे काय ? होय; शक्य आहे, आणि तसें नेहमीं होतही असतें: भक्तिव्यवसायांतही वेठ आहे, इतकेंच की, ती परमेश्वर आम्हांवर लादीत नाहीं; ती आपण होऊन आम्हीं आपणावर लादून घेत असतों. अशा प्रकारच्या भक्तिव्यवसायापासून फलप्राप्ति होत नाहीं. प्रसन्नता उत्साह, परमेश्वराच्या सद्धेतूविषयीं माहिती वगैरे कांहीं निष्पन्न होत नाहीं; आणि आपली गति उन्नत किंवा अवनत होत आहे, हें समजण्यासारखी खूणही मिळत नाहीं. वेठ सापेक्ष आहे; गरीब, श्रीमंत, समर्थ, दुर्बल, अशा परस्परविरुद्ध स्थितींत असणाऱ्या लोकांची कामकाजांच्या संबंधानें गांठ पडते, तेव्हां वेठीचा प्रकार होऊं शकतो. असें असतां "वचनींच संत पावले स्वरूप, माझें नेदी पाप योगा येऊं;" "शुक्र, नारद सनक, सनंदन इत्यादि भक्त नामाच्या संकीर्तनानें तुझ्या स्वरूपाप्रत पावले असतां, माझें पाप आडवे येऊन तशी प्राप्ति होत नाहीं; असें कां होतें, ही शंका मनांत येऊन आपण भक्ति करितों ती वेठीचा व्यावसाय तर होत नाहींना ? आपली पूजा अर्चा, आपलें भजन व नामसंकीर्तन यांत वेठीचा प्रकार होतो, असें तर नसेल ना ?" या विचारांत तुकारामबावा पडले. अशा स्थितींत असतां मनाला स्थैर्य, धैर्य व शांति आली पाहिजे; उद्योग झाला पाहिजे; तसें होत नाहीं. आपण परमेश्वराची भक्ति करतों; मग पापाला चित्तांत जागा कोठें राहिली ? अशा शंका मात्र आपणांस येतात. या बाबतींत एकानें दुसऱ्याला सांगावयाचें काम नाहीं; ज्याचा त्यानें आपल्या मनाशीं विचार केला पाहिजे.

धर्मसंबंधीं जें आपलें आचरण होत असतें, भजनपूजनादि जे आपण प्रकार करितों, त्यांत लोकांचें काम नाहीं, तें आपलें आहे असें समजून आपण चालतों

कीं काय याविषयीं आपल्या मनाची साक्ष कशी काय पटते, तें प्रत्येकानें पाहिलें पाहिजे. हा विचार करितांना परमेश्वर अलिप्त आहे; तो कोणत्याही प्रकारची वेठ आपल्यावर घालीत नाहीं, हे लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. केवळ निरुपायानें एखादें काम करणें व तेंच उत्साहानें अंग मोडून करणें, यांत पुष्कळ फरक असतो, ही प्रत्येकाची अनुभवाची गोष्ट होय. निरनिराळ्या इंद्रियांचे व्यापार एका प्रकारचे व्हावे आणि मनाची प्रवृत्ति दुसरीकडे असावी, म्हणजे त्या क्रियेला वेठीचें स्वरूप थोड्याबहुत अंशी येत असतें. स्मरणी घेऊन जप करण्यांत कांहीं नाहीं, व संवय लागण्याच्या कामीं स्मरणी निरुपयोगी आहे असेंहि नाहीं; परंतु मनाची धांव दुसरीकडे असतां, नुस्ते मणि ओढलें तर ती केवळ वेठ होय. कर्ममार्गांत हा वेठीच्या भक्तिव्यवसायाचा प्रकार नित्य दृष्टीस पडत असतो. व्रतें, अनुष्ठानें इत्यादिकांच्या भानगडींत न पडणाऱ्या आपणामध्येंही जो विधीचा भाग आहे त्यांत वेठ होऊं शकते परमेश्वर कोणत्याही प्रकारें आपल्या डोईवर धोंड देत नाहीं. असें समजून मनानें एखादी गोष्ट घेतली असतां, ती उत्साहाने व मनोभावानें केली, तरच ती फलप्रद होईल. अशी वस्तुस्थिति असून अनेक वेळां असें होतें कीं, शुष्क बाह्य क्रियेलाच सर्वपरी प्राधान्य देण्यांत येतें, आणि तिजमध्यें मन संलग्न आहे किंवा नाहीं याचा निर्बंध एकीकडे राहतो. अशी स्थिति झाली म्हणजे मनाला समाधान होत नाहींसें होतें, आणि अन्य तऱ्हेचे दोष उद्भवतात.

विधिविधानांचा व क्रियाकलापांचा मूळ उद्देश आत्म्याला वळण लागण्याचा; त्याबद्दल हातांना, पायांना, जिभेला मात्र वळण लागतें. इंद्रियांस काय, मनास काय निर्बंध पाहिजे आणि त्याशिवाय तीं सुयंत्रित चालत नाहींत, ही गोष्ट खरी आहे. पण, इतर साधारण गोष्टींप्रमाणें धर्माच्या बाबतींत केलेल्या व्यवसायांत मन एकनिष्ठ असल्याविना कदाचित त्यानें इंद्रियाला, शरीराला वळण लागेल, पण परमेश्वराच्या ठायीं तल्लीनता उत्पन्न होत नसल्याकारणानें तो विफल होतो. वेठीच्या तऱ्हेच्या व मनोभावानें उत्साहपूर्वक होणाऱ्या भक्तिव्यवसायानें जे मनावर संस्कार होतात त्यांत महदंतर असतें. अशा प्रकारचें जड भक्तिव्यवसाय एकदम टाकून द्यावें असें सांगण्याचा भाग नाहीं, आणि तसें सांगणें अन्यथा आहे. पण तेणेंकरून पापाविषयीं तिटकारा व सदाचरणाविषयीं आवड उत्पन्न होण्याचा संभव नाहीं कोणतेंही काम सक्तीनें, किंवा जबरीनें करावें लागलें, आणि त्यांत स्वतःचें हित आहे, अथवा तें आपलें कर्तव्य आहे असें वाटून तें मनापासून झालें नाहीं, तर त्यांत काम करविणाऱ्या धन्याच्या चांगुलपणानें, किंवा कडवेपणानें जो काय फरक होतो, तो इतकाच कीं, चांगला धनी असला, तर तो पोटभर जेवावयाला घालतो; तोच वाईट, द्वाड असला तर अपशब्द बोलून अर्धपोटीं, अथवा खावयास कांहीं न देतां घालवून देतो; पण वेठीचा भाग राहतोच राहतो. मनुष्य केवळ काम करतो, परंतु

मन तेथें नाहीं, तर तें व्हावें तसें होत नाहीं. आणि त्यांत फारसा अर्थ नसतो. धर्मसंबंधीं बाबतींतहि, एकादी क्रिया करतां करतां ती वेठीच्या तऱ्हेनें करण्याची साधारण प्रवृत्ति असते. चांगल्या संवयीं लागाव्या, हें अत्यंत इष्ट आहे; परंतु नियमानें एखादी क्रिया केली, म्हणजे होतां होतां तिचा आत्म्यावर मनाच्याद्वारें पूर्वी परिणाम होत असे, तसा होत नाहींसा होतो. आपणामध्यें दुर्बळता किती आहे याचा विचार केला असतां चांगल्या संवयी लावून वेठीच्या रीतीनें कार्यें होतात; जीं मनाच्या स्फूर्तीनें होणारीं तीं होत नाहींत. आपण योजिलेल्या उपायांनीं व निर्बंधांनीं अमुक एक प्रकारच्या संवयी लागतात, आणि त्या लागल्याही पाहिजेत. मोठी पंचाईत ही असते कीं, केवळ संवयीनें कोणतीही गोष्ट झाली म्हणजे समान्यत: वेठीचें स्वरूप येतें. चांगल्या संवयीची व अभ्यासाची मातब्बरी इतर गोष्टींप्रमाणें धर्ममार्गांतही मुळींच नाहीं असें नाहीं; परंतु संस्काराचें महत्त्व अधिक आहे, आणि तें जागृत राहील असें केलें पाहिजे. धर्मासंबंधीं बाबतींत तल्लीनतेनें होणारी फलप्राप्ति कांहीं चमत्कारिक आहे. दोन गोष्टी होत असतां मनाला संस्कार काय व कसा होतो याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. आतां आषाढी एकादशी जवळ आली आहे; यास्तव चहूंकडून पंढरपुरास जाणाऱ्या वारकऱ्यांचेंच उदाहरण आपण घेऊं या. त्यांतून बरेच, वारीचा नेम केला, म्हणून फक्त वारी करणारे असतात; परंतु कित्येक वारी करीत असतां त्याच संधीस व्यापारधंदा करणारे असतात. तथापि व्यापार करणाऱ्या वारकऱ्यांस फलप्राप्ति कमी होते, अथवा मुळींच होत नाहीं, असें अनुमान करणें बरोबर नव्हे. साधक स्थितींतील विचारी लोक संवयीस प्राधान्य देत नाहींत; त्यांच्या दृष्टीनें मनावर होणाऱ्या संस्काराला महत्व अधिक असतें. अशुद्ध मार्गानें जाणाराही संस्कारावर लक्ष देणारा असला, तर त्याला फल प्राप्ति अधिक होते. यासंबंधानें प्लेगसारख्या ज्या भयंकर व्याधीनें येथें व अन्यत्र लोकांस घरदार नकोसें करून त्यांची दाणदाण करून सोडली आणि कोण कोणास पुसेनासें झालें, तिचा धर्मदृष्ट्या विचार केला असतां, अशा दुर्धर प्रसंगामध्यें अल्पांश तरी आपल्या हिताचा आहे, व त्याचा मनावर सुसंस्कार होण्यासाठीं आपण उपयोग केला पाहिजे, असें आपणांस वाटण्यासारखें आहे. सारांश, या अभंगावरून मुख्य बोध घ्यावयाचा तो हा कीं, इतर गोष्टींप्रमाणें धर्ममार्गांत चांगल्या संवयींचा उपयोग असला तरी त्यांचा मान. त्यांचा अधिकार संस्कारापेक्षां कमीच, आणि संस्काराची महती मनांतून उठवून देईल अशी संवय लागतां कामा नये. नाहींपेक्षां भक्तिव्यवसाय व भजनपूजनाची खटपट यांस वेठीचें स्वरुप घेऊन मनास समाधान होणार नाहीं, आणि परमेश्वरदर्शनाचा लाभ न होतां ही वेठीची भक्ति निष्फळ होईल.

# भगवंता ! ही सारी तुझीच कृपा !

भगवान् बुद्ध एकदां भिक्षा मागत एका श्रीमंत शेतकऱ्याच्या अंगणांत येऊन उभे राहिले. त्यांनीं आपलें भिक्षापात्र पुढें केलें. तो शेतकरी म्हणाला, "अशी भीक कशाला मागतां ? माझ्यासारखे शेतकरी व्हा. ही पहा सोन्यासारख्या धान्याची येथें रास पडली आहे." भगवान् बुद्ध म्हणाले, "गड्या, मीसुद्धां एक शेतकरीच आहे.

"काय, तुम्ही शेतकरी आहांत ? कोठें आहे तुमचें शेत ? कोठें आहे नांगर ? कोठें आहेत बैल ? कोणतें पीक घेतां ?"

"माझें हृदय हें माझें शेत. तेथें विवेकाचा नांगर जोडतों. सारें वासनाविकारांचें रानगवत काढतों. प्रेमाचें, सत्य–अहिंसेचें अपरंपार पीक घेतों."

अशी ही देवाघरची शेती आपणांस करावयाची आहे. देहाच्या या साधनानें हे सद्गुण अंगीं आणावयाचे आहेत. तो प्रसिद्ध तत्त्वज्ञानी कार्लाइल एके ठिकाणीं म्हणतो, "माणसें हीं गिधाडासारखीं आहेत. जरा कांहीं करतांच त्यांना फळ हवें असतें. मोबदला हवा असतो; परंतु ईश्वरानें हा देह आधींच दिला आहे. बुद्धि दिली आहे. हृदय दिलें आहे. या ज्या अमोल देणग्या आधींच मिळाल्या आहेत त्यांबद्दल कृतज्ञ राहून आपण सदैव सेवा केली पाहिजे. कांटा दिसला तर दूर करावा. दगड दिसला बाजूला फेकावा. जेथें ओसाड, उजाड असेल तेथें हिरवें हिरवें करावें. प्रभूनें जें आधींच दिलें आहे त्याचें उतराई म्हणून आपण सत्कर्में करीत राहणें हेंच आपणांस शोभतें."

परंतु हे सद्गुण एकाएकीं येतील असें नाहीं. एकेक गुण अंगीं यावा म्हणून बुद्धदेवांनीं शेंकडों जन्म घेतले. आपल्या अंतःकरणांत प्रभूचा सूर असतो. "बाबा रे, हें कर, चांगलें आहे. तें वाईट आहे. तें नको करूं." असें कोणी तरी अंतर्यामीं आंतून हळूच सांगत असतो; परंतु ती मंजुळ वाणी आपणांस जणुं ऐकूं येत नाहीं. तो अंतर्यामी लादणारा नसतो. मारूनमुटकून करायला लावणार नाहीं. तो हळूच सांगेल. ऐकलेंत तर बरें; नाहीं. तर आशेनें वाट पहात राहिल.

परमेश्वरासारखा आशावान् कोण आहे ? हजारों वर्षे मानवाला जन्मून झालीं. तरी अद्याप तो माकडासारखा वागत आहे ! वृकव्याघ्रांप्रमाणें रक्तपिपासु आहे. आईबापांना एकदा मुलगा जरा बिघडला तरी त्यांना दुःख होतं; मग ज्या प्रभूचीं कोट्यवधि लेंकरें आज हजारों वर्षे बिघडत आहेत त्या प्रभूनें किती निराश व्हावें ? बर्नार्ड शॉ या विख्यात इंग्रज नाटककारानें एके ठिकाणीं लिहिलें आहे, "मानवाला

निर्माण करण्याचा आपला प्रयोग फसला असें समजून ही सारी मानवजात प्रभु एके दिवशीं पुसून टाकील!" आपणांस निराशेनें असें वाटलें तरी प्रभूला तसें वाटत नाहीं. त्याची अमर आशा आहे, त्याचें प्रेम कमी नाहीं झालें. त्याचे तारे, त्याचे वारे, त्याचे मेघ, त्याचीं फुलें, फळें, सारें आपणांसाठीं सदैव उभें आहे.

मनुष्याचें प्रेम गुलाम करतें. आईबाप मुलाला प्रेमानें वाढवतात; परंतु त्यांच्या मताप्रमाणें मुलगा न वागला तर त्यांना वाईट वाटतें. "तुला ध्वळ्यासाठीं वाढवलें का?" असें तीं विचारतात. परमेश्वर कधीं विचारीत नाहीं. तो अनंत हस्तें देत आहे. एक दिवस हा मानवप्राणी माझ्याकडे येईल. अशी त्याला अनंत आशा आहे.

तेराव्या अध्ययांत पुढील श्लोक आहे.

**"उपद्रष्टाऽनुमन्ता च भर्ता भोक्ता महेश्वर"**

प्रभु प्रथम उपद्रष्टा असतो. तो जवळ उभा राहून तुमच्याकडे पाहतो. बोलत नाहीं. तुमचें केव्हां तरी लक्ष वेधेल या आशेनें तो असतो. कधीं हळूच बोलला तरी तें आपणांस ऐकूं येत नाहीं; परंतु जगांतील अनुभवानें आपण जरा अंतर्मुख होतों. जीवन चांगलें जगावें असें मनांत येऊं लागतें. जीवनांत विवेक येतो. असें करावें, असा निश्चय करावा, आजपासून हे ध्येय असे बेत आपण करूं लागतों. त्या अंतर्यामीला आनंद होतो. तो हळूच होकार देतो. अनुमति देतो. "बाळ, असाच वाग हो. चांगला आहे. तुझा निश्चय. तो टिको." असें तो उपद्रष्टा म्हणतो. उपद्रष्टा आतां केवळ दुरून बघणारा न राहतां जवळ येतो. पाठीवर शाबासकी देतो. तो मित्र होतो. पुढें आपण धडपडत जातों. संकटांत आधार कोठून मिळतो? अंधारात प्रकाश येतो. वाटतें, कीं प्रभूच साहाय्य देऊन राहिला आहे. तोच भर्ता, तोच आधार. त्या अंतर्यामीविषयीं अपरंपार भक्तिप्रेम वाटतें. सारा अहंकार गळतो आणि आपण म्हणतों, "देवा तुझाच आधार आहे. तूंच प्रकाश दिलास. तूंच सांभाळलेंस. तूंच माझें तारण केलेंस. माझ्या हातून जें कांहीं झालें असेल, तें तुझ्या कृपेचें फळ. जें कांहीं माझ्या हातून झालें असेल, तें तूंच घे. तूच त्याचा भोक्ता हो. या चराचराचा चालक तूं महेश्वर. तूं माझ्या हृदयांत बसून मला हळूहळू सन्मार्गावर आणलेंस. तुझी ही कृपा."

असें शब्द आपल्या तोंडून बाहेर पडतात. वृत्ति निरहंकार होते आणि जीवनाच्या शेतांत आपण सद्गुणांचें पीक घेऊं लागतो. एक गुण आला कीं त्याच्या ओढीनें दुसरा येतो आणि ही सद्गुणसंपत्ति वाढूं लागते. जीवनांत ज्ञानाची प्रभा फांकते. कर्में सुंदर व निर्मळ होऊं लागतात. जीवनाचें हेंच साफल्य. जन्माला येऊन दुसरें काय मिळवायचें?

—:०:—

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फें प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकूर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality**- by Pradhan | | | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** (Telgu) | | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नांवें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** by R. S. Harshid Mehta | | | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** (Eng.) Calcutta | | | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** (English) | | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone | 15" × 20" Thick | 1-00 |
| (2) | ,, ,, ,, | 9½" × 13½" medium | 00-37 |
| (3) | ,, ,, in Dwarkamai | 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs. 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां

प्रकाशक : श्रीपाद बाळकृष्ण दर्प, मुंबई १४.



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई

टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबांचीं तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.


मुद्रक: श. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.

संपादक व प्रकाशक: श्रीपाद बाळकृष्ण दर्प, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.